दैनिक

# सिंधुदुर्ग समाचार

ग्रामीण जनतेचे एकमेव लोकप्रिय मराठी दैनिक

सिंधुदुर्ग-मुंबई

www. sindhudurgsamachar. in

T-2/RNP/SDG-06/2021-2023

संस्थापक : प्राचार्य मुकुंदराव कदम

नोंदणी क्र.एमएलव्ही/२१/०९ रजिस्ट्रेशन क्र. ४३७११/८५ ● शुक्रवार दि.८ मार्च २०२४ ● पाने ४ ● वर्ष ३९ ● अंक १२७ ● किंमत ३ रू ● सिंधुदुर्ग, मुंबई, रत्नागिरी, रायगड, गोवा, पुणे

# कर्जमाफी, नुकसानी पासून वंचित शेतकरी लोकसभेत बजावणार नोटा

## मागण्या मान्य करा,अन्यथा नकारात्मक मतदान करणार शेतकऱ्यांचा इशारा

जिल्ह्यातील शेतकऱ्यांची कर्जमाफी तसेच विविध पिकांच्या नुकसानीची नुकसान भरपाई मिळावी. यासाठी जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी संघटित होऊन लढा देणे आवश्यक आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या विविध समस्या आणि नुकसान भरपाई तसेच कर्जमाफी या मागण्यांसाठी गेली १० वर्षे काही ठराविक शेतकऱ्यांच्या माध्यमातून आंदोलने, उपोषण करून लढा दिला जात आहे. मात्र शासनाकडून अद्याप त्याची दखल घेण्यात आलेली नाही. त्यामुळे आता जिल्ह्यातील सर्व शेतकऱ्यांनी संघटित होऊन आपल्या मागण्यांसाठी लढा देणे आवश्यक आहे. त्यासाठी जिल्ह्यातील शेतकऱ्यांची अधिकृत संघटना असणे गरजेचे आहे. तरी जिल्हास्तरीय शेतकरी संघटना स्थापन करण्यासाठी रविवार १० मार्च २०२४ रोजी सकाळी १० वाजता श्री रवळनाथ मंदिर ओरोस येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. तरी जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी या बैठकीस मोठ्या संख्येने उपस्थित राहावे. असे आवाहन शेतकरी संघटना संघटक शामसुंदर राय यांनी केले आहे.



**सिंधुदुर्ग । जिल्हाप्रतिनिधी**

जिल्ह्यातील शेतकऱ्यांना खावटी कर्जमाफीचा लाभ मिळावा ,सन २०१७ च्या यादितील शेतकऱ्यांना सन्मान योजनेचा लाभ मिळावा. थ्रिप्स रोगामुळे व कोळे रोगामुळे झालेल्या नुकसानीची नुकसान भरपाई मिळावी. या मागणीकडे आज जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालया समोर लाक्षणिक धरणे आंदोलन केले. तर मागण्या मान्य न झाल्यास आगामी निवडणुकामध्ये नोटा हे बटन दाबून मतदानाचा हक्क बजावणार असल्याचा इशारा दिला आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील आंबा व काजू पीक घेणाऱ्या सर्वसामान्य शेतकऱ्यांना अद्यापही कर्जमाफी मिळाली नाही. शासनाकडून केवळ कर्जमाफीची घोषणा करून शेतकऱ्यांची फसवणूक केली जात आहे. निवडणूका आल्या की कर्जमाफीची जाहीर करून गेली १० वर्षे शेतकऱ्यांची फसवणूक होत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचा आता शासनाच्या घोषणावर विस्वास राहिलेला नाही. कायम फसवणूकच होणार असेल तर जिल्ह्यातील शेतकरी आता कोणीही योग्य नसल्याचा दाखला देण्यासाठी येणाऱ्या निवडणुकीत नोटा बटन दाबून आपला मतदानाचा हक्क बजावणार आहेत. तसा निर्णय झाला असून यासाठी निवडणूक कालावधीत सर्व शेतकरी आपल्या गावात प्रयत्न करणार आहेत. याची दखल शासनाने घ्यावी व शेतकऱ्यांना दिलेला कर्जमाफीची तात्काळ कार्यवाही करावी. याकडे लक्ष वेधण्यासाठी जिल्ह्यातील शेतकऱ्यानी आज पुन्हा जिल्हाधिकारी याना निवेदन देऊन लाक्षणिक उपोषण सुरु केले आहे. सन २०१७ च्या यादीतील ३०७७ शेतकरी छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेअंतर्गत अद्याप कर्जमाफी न मिळालेल्या उर्वरित शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ देण्याचा निर्णय शासनाने घेतला परंतु सिंधुदुर्ग जिल्ह्यातील शेतकरी अद्यापही कर्जमाफीच्या प्रतीक्षेत आहेत. याबाबत अनेकवेळा आंदोलने केली, उपोषण केले तरी याबाबत शेतकऱ्यांना न्याय मिळाला नाही. तसेच २ लाख वरील कर्जदार शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी दयावी. रत्नागिरी जिल्ह्यातील शेतकऱ्या ना अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीची भरपाई देण्याचा निर्णय झाला त्या प्रमाणे सिंधुदुर्ग जिल्ह्यातील शेतकऱ्या ना लाभ द्यावा. अशी मागणी निवेदनातून केली आहे. यावेळी जिल्हा शेतकरी संघटक श्याम सुंदर राय, प्रकाश वारंग, आग्नेल फर्नांडिस, अर्जुन नाईक, रामकृष्ण चिचकर, सुरेश गावकर, महेश चव्हाण,सुधीर परब, लाडू परब, कृष्णा तुळसकर,अमोल सावंत, संतोष पेडणेकर, संदीप देसाई आदीं शेतकरी उपस्थित होते.

## थोडक्यात



### कोकण परिमंडळात लाईनमन दिवस उत्साहात साजरा

**कणकवली । वार्ताहर**

कोकण परिमंडळात रत्नागिरी व सिंधुदुर्ग मंडळात देशव्यापी परंपरा म्हणून दि.०४ मार्च रोजी लाईनमन दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. विद्युत क्षेत्राचा कणा असलेल्या लाईनमनच्या अथक परिश्रम आणि सेवेप्रती कृतज्ञता व्यक्त करताना त्यांचा सन्मान करण्यात आला. रत्नागिरी शहर, कणकवली, चिपळूण, वैभववाडी इ. ठिकाणी विद्युत सुरक्षा रॅली काढण्यात आली. रत्नागिरी येथे अधिक्षक अभियंता स्वप्नील काटकर यांच्या अध्यक्षतेखाली लाईनमन दिवस कार्यक्रम संपन्न झाला. याप्रसंगी अधिक्षक अभियंता (पायाभूत आराखडा) कल्पना पाटील, सहाय्यक महाव्यवस्थापक वैभव थोरात, कार्यकारी अभियंता राजश्री मोरे, कार्यकारी अभियंता नितीन पळसुलेदेसाई, कार्यकारी अभियंता दत्तात्रय साळी, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी अप्पासाहेब पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.



### ट्रकची दोन दुचाकींना धडक, एक जण जखमी

**मालवण । वार्ताहर**

चिरे वाहतूक करणाऱ्या ट्रकने रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या दोन दुचाकींना धडक दिली. यात दुचाकी अंगावर कोसळल्याने एक जण जखमी झाला आहे. ही घटना आज सायंकाळी ४ वाजण्याच्या सुमारास धामापूर येथे घडली. कुंदन सहदेव हुर्णे कर असे जखमीचे नाव आहे. अपघातानंतर ट्रक चालकाने पळून जाण्याचा प्रयत्न केला. मात्र त्याला पाठलाग करून काळसे येथे पकडण्यात आले.

### ४८ तासात कारवाई न झाल्यास बांधकाम कार्यालयासमोर उपोषण

**आंबोली । वार्ताहर**

आंबोली मुख्य घाटापासून ते आजरा फाटा येथे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीत असलेल्या रस्त्याच्या दुतर्फा अनेक अनधिकृत बांधकामे, हॉटेल असून ती तात्काळ काढून टाकण्यात यावी अशी मागणी अमित परब यांनी केली आहे. ते म्हणाले, या बांधकामांमुळे वाहतूकीस अडथळा निर्माण होत असतो. त्यामुळे येत्या ४८ तासात योग्य ती कारवाई करण्यात यावी. तसे न झाल्यास आपल्या कार्यालयासमोर उपोषण करण्यात येईल याची असा इशारा चराठा उपसरपंच अमित परब यांनी सार्वजनिक बांधकामच्या कार्यकारी अभियंतांना दिला आहे.

## फोंडा घाटामध्ये विद्युत केबल वाहतूक करणारा कंटेनर पलटी



**फोंडाघाट । प्रतिनिधी**

मध्यप्रदेश वरून गोव्याच्या दिशेने विदयुत केबल ची वाहतूक करणारा कंटेनर क्र. एम एच ४६- बी एफ ३८०३ हा फोंडाघाट पासून सुमारे ५ किमी वरील अवघड वळणावर आला असता चालकाचा गाडीवरील ताबा सुटल्याने रस्त्याच्या मधो मधच कंटेनर पलटी झाला. सदरची घटना आज सकाळी सुमारे १०.३० च्या दरम्याने घडली याबाबत सविस्तर वृत्त असे की, कंटेनर चालक ओम प्रकाश जगमोहन बर्मा वय ४५ राहणार उत्तर प्रदेश प्रतापगढ हे आपल्या ताब्यातील कंटेनर क्र. एम एच ४६- बी एफ ३८०३ यामधून मध्यप्रदेश वरून

पान ३ वर...

## निवडणूक रोखे प्रकरणात सीबीआय अडचणीत; सुप्रिम कोर्टात अवमान याचिका दाखल

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

सुप्रिम कोर्टाने इलेक्ट्रोल बाँडची माहिती जाहीर करण्याचे आदेश देऊनही त्यावर कार्यवाही न केल्याबद्दल स्टेट बँक ऑफ इंडियाच्या विरोधात न्यायालयाचा अवमान केल्याची याचिका दाखल करण्यात आली आहे. असोसिएशन ऑफ डेमोक्रॅटिक रिफॉर्मस आणि कॉमन कॉज या संस्थेने ही याचिका दाखल केली आहे. तर कायदेतज्ज्ञ प्रशांत भूषण यांनी या याचिकेवर तातडीने सुनावणी घ्यावी, असे या अवमान याचिकेत म्हटले आहे. गेल्या महिन्या घटनापीठाने स्टेट बँक ऑफ इंडियाला एप्रिल २०१९पासून इलेक्ट्रोल बाँड खरेदी केलेल्या सर्वांची माहिती निवडणूक आयोगाला सादर करण्याचे आदेश दिले होते. यासाठी ६ मार्च ही अंतिम तारीख देण्यात आली होती. पण निर्धारित तारखेच्या एक दिवस आधी स्टेट बँक ऑफ इंडियाने यासाठी ३० जूनपर्यंत मुदतवाढ द्यावी अशी मागणी केली.

असोसिएशन ऑफ डेमोक्रॅटिक रिफॉर्मस आणि कॉमन कॉज या संस्थांनी आता स्टेट बँक ऑफ इंडियाविरोधात न्यायालयाचा अवमान केल्याची याचिका दाखल केली आहे. स्टेट बँक ऑफ इंडियाने मुदतवाढ मागणारी याचिका दाखल केली आहे, त्याचे लिस्टिंग सोमवारी होणार आहे, तर भूषण यांनी अवमान याचिकेचे लिस्टिंगही सोमवारी केले जावे अशी मागणी केली आहे. स्टेट बँक ऑफ इंडिया जाणीवपूर्वक सुप्रिम कोर्टाचे आदेश टाळले आहेत, त्यामुळे स्टेट बँके ऑफ इंडियाने न्यापालिकेचा अवमान केला आहे, असे या याचिकेत म्हटले आहे. स्टेट बँक ऑफ इंडियाची मुदतवाढ मागणीची याचिका ही दूषित आहे, देशातील आगामी लोकसभेच्या निवडणुका पारदर्शकपणे व्हाव्यात

पान ३ वर...

## काजूला हमीभाव मिळण्यासाठी १० मार्च रोजी दोडामार्ग येथे रस्ता रोको



**दोडामार्ग । वार्ताहर**

दोडामार्ग तालुक्यातील काजू बागायतदार शेतकरी यांची बैठक फळबागायतदार संघटना अध्यक्ष विलास सावंत यांच्या नेतृत्वाखाली दोडामार्ग गणपती मंदीर येथे पार पडली. या बैठकीत राज्य सरकार लोकप्रतिनिधी लक्ष देत नाही नाही नाराजी व्यक्त केली. काजूच्या दरात घसरण होत आहे त्यामुळे रस्ता रोको आंदोलन करून सरकारला जाग आणण्यासाठी १० मार्च रोजी दोडामार्ग गांधी चौकात रस्ता रोको आंदोलन करण्याचा निर्णय घेण्यात आला. या संदर्भात दोडामार्ग तहसीलदार पोलिस निरीक्षक याना निवेदन देण्यात आले. दोडामार्ग सावंतवाडी तालुक्यातील काजू बागायतदार शेतकरी यांच्या काजूला किलो

पान ३ वर...

## चिंदर-तेरई-कालावल मंजूर रस्त्याचे काम अद्याप पर्यंत का सुरू केले नाही?



**मालवण । वार्ताहर**

चिंदर-तेरई-कालावल या मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून मंजूर रस्त्याचे काम अद्याप पर्यंत का सुरू केले नाही? असा सवाल उपस्थित करत चिंदर तेरई ग्रामस्थांनी कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र ग्रामिण विकास संस्था संस्था सिंधुदुर्ग, कुडाळ यांचे लक्ष वेधले आहे.

दिलेल्या निवेदन पत्रात म्हटले आहे, आम्ही ग्रामस्थ चिंदर, ता. मालवण आपणांस अशी विनंती करतो की, चिंदर-तेरई-कालावल हा रस्ता मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेतून मंजूर झाला असून तीन महिन्यांपूर्वी सदर रस्त्याचे भुमिपूजन सिंधुदुर्ग जिल्हयाचे पालकमंत्री यांच्या हस्ते करण्यात आले होते. निधी मंजूर असूनही सदर रस्त्याच्या कामाला अद्यापपर्यंत सुरूवात करण्यात

पान ३ वर...

## गोठणे गावातील चारवाड्यांचा मुख्यरस्ता गोठणेमाळ ते सडेवाडी आजही पक्की सडक बनण्याची करतोय प्रतीक्षा

**सिंधुदुर्ग । जिल्हाप्रतिनिधी**

विकासासाठी निधी कमी पडू देणार नाही असे म्हणत नेत्यानी पाठ फिरवल्यामुळे पक्का रस्ता नसल्यांने गोठणे गावच्या त्या वाड्यांच्या विकासाला खिळ बसली आहे. आमदार खासदारानी तर दखल घेतली नाहीच, मुख्यमंत्र्यानीही विनंती अर्जांना केराची टोपली दाखवली. मालवण- तालूक्यातील गोठणे गावातील गोठणेमाळ ते सडेवाडी अशा चार वाड्यांना जोडणारा सात किलोमीटरचा मुख्य रस्ता कित्येक वर्ष प्रधानमंत्री ग्राम पक्की सडक बनण्याची वाट पाहतोय, रस्ते हे ग्राम जिवनाला सर्मद्धीच्या दिशेने नेणारे समजले जातात आणि म्हणून यावर भरमसाठ निधी भारत सरकार खर्ची करत असते.

प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेतून हा रस्ता व्हावा किंवा स्थानिक आमदार, खासदार किंवा अन्य एखाद्या योजनेतून निधी मंजूर करून हा रस्ता पक्का व्हावा असे स्थानिकांचे व ग्रामपंचायतीने म्हटले आहे.



जेणे करून पाचशेहून जास्त लोकसंख्या असलेल्या वस्तीच्या वाड्यांचा विकास व्हावा, त्याचप्रमाणे शालेय विद्यार्थी, वृद्ध ग्रामस्थ, तसेच गर्भवती महीलांना अडचणीच्या वेळी योग्य औषध उपचारासाठी दळणवळणाची साधने त्वरीत उपलब्ध व्हावीत यासाठी कित्येक वर्ष गोठणे ग्रामपंचायत संबंधीत शासकीय यंत्रणेशी पत्रव्यावहार करीत आहे. पण संबंधीत विभाग याकडे दुर्लक्ष करित असल्याने

पान ३ वर...

## देशातील हुकूमशाही विरोधात रत्नगिरीत ११ मार्चला ‘निर्भय बनो’ सभेचे आयोजन

**रत्नागिरी । प्रतिनिधी**

आगामी काळात होणाऱ्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर देशात चाललेल्या हुकूम शीविरोधात प्रबोधन करण्याच्या उद्देशाने रत्नागिरीत ११ मार्च रोजी सायंकाळी ४ वाजता जलतरण तलाव साळवी स्टॉप येथे निर्भय बनो सभेचे आयोजन केले आहे. यात सामाजिक कार्यकर्ते तसेच विचारवंत व पर्यावरणतज्ज्ञ डॉ. विश्वंभर चौधरी आणि मानवी हक्क, संविधान विश्लेषक व कायदेतज्ज्ञ ड.असीम सरोदे हे मार्गदर्शन करणार आहेत. ही सभा ‘आम्ही निर्भय रत्नागिरीकर’च्या वतीने होणार आहे अशी माहिती संयोजक अभिजीत हेगशेट्ये यांनी आज पत्रकार परिषदेत दिली. यावेळी कुमार शेट्ये, बशीर मुर्तुझा, दीपक राऊत, विलास कोळपे, नीलेश भोसले उपस्थित होते. यावेळी हेगशेट्ये म्हणाले की, बेरोजगारी, भ्रष्टाचार, महिलांवरील अन्याय, अल्पसंख्यांक समुदायांच्या अधिकारांचा संकोच, शेतकऱ्यांच्या वाढणाऱ्या आत्महत्या, दलितांवरील अत्याचार, सांविधानिक संस्था व प्रशासकीय यंत्रणा यांवर निर्माण केलेल्या दबाव, डिजिटल माध्यमांवर निर्माण केलेली हुकूमत आदी आजचे कळीचे मुद्दे आहेत; मात्र या



पान ३ वर...

## शेतकऱ्यांवर आत्महत्येची वेळ आली हीच मोदींची गॅरंटी; शरद पवारांची बोचरी टीका

**लोणावळा । वृत्तसंस्था**

आश्वासन, टीका-टीप्पण्णी करणं या पलिकडे सरकारने काय केलं आहे? शेतकऱ्यांवर आत्महत्येची वेळ आलीय, हीच मोदींची गॅरंटी आहे, अशी बोचरी टीका राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांनी केली. लोणावळा येथे कार्यकर्ता मेळाव्यात बोलताना त्यांनी भाजपा सरकारवर तोंडसुख घेतले. लोकशाहीला संकटात नेणारा कारभार मोदींकडून सुरू आहे. सामान्य माणसांचे अधिकार उद्ध्वस्त होत आहेत. त्यामुळे लोकशाही आणि घटनेचे संरक्षण करण्याची जबाबदारी आपली आहे, तुम्ही सर्वांनी यात सहभागी व्हायला हवे, असे आवाहनही शरद पवार यांनी केले. पक्ष स्थापनेपासून आम्ही विचारधारा कधीच बदलली नाही. जवाहरलाल नेहरुंबद्दल काहीही बोललं जातं आहे. गांधी, सुभाषबाबू, जवाहरलाल नेहरू यांचं योगदान हा देश स्वतंत्र करण्यासाठी होतं. अशा लोकांची नोंद जाणकारांनी घ्यायची असते. आज देशाचे पंतप्रधान प्रत्येक दिवशी पूर्ण पान जाहिरात देत आहेत. त्याच मोदींची गॅरंटी देत आहेत, पण ही कोणाच्या पैशाने जाहीरात दिली जात आहे. आज ते सांगत आहेत की शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट

पान ३ वर...

दैनिक सिंधुदुर्ग समाचार

**दैनिक सिंधुदुर्ग समाचार मधून आपल्या बातम्या, अडचणी थेट वाचकांपर्यंत पोहचविण्यात येतील आणि त्याला नावासहित प्रसिद्ध दिली जाईल. लेख, कथा, कविता sindhudurg. samachar@gmail. com या ईमेल वर पाठवू शकता. तसेच सिंधुदुर्ग समाचारचा अंक सुरू करण्यासाठी, व जाहीराती, बातम्यांसाठी संपर्क ९८२२९७९७३२.**

kdrupa@gmail.com

सिंधुदुर्ग समाचार

।। बुडती हे जण न देखवे डोळा! ।।

# न्यायमूर्ती चंद्रचूडांचे दोन निर्णय मोदी सरकारसाठी ठरतील अडचणीचे?

भारताचे न्यायमूर्ती डी चंद्रचूड सतत मोदी सरकारला आरसा दाखवत आहेत आणि काल इंडियन एक्सप्रेसच्या रामनाथ गोएंका पुरस्कार सोहळ्यात मोदी सरकारच्या दोन मंत्र्यांच्या उपस्थितीत त्यांनी सरकारला आरसा दाखवला. डी.चंद्रचूड यांच्या कोर्टात फक्त दोनच निर्णय आहेत आणि जर ते दोन निर्णय मोदी सरकारच्या विरोधात काढले गेले तर मग २०००-२४ च्या लोकसभेचे चित्र निश्चितच बदललेले असेल? त्यांनी सांगितले की पत्रकाराचे कामच आहे सत्तेवर असलेल्याला प्रश्न विचारणे आणि सत्तेवर प्रश्नचिन्ह लावणाऱ्या पत्रकारांवर कधीही हिंसाचार करू नये. सत्तेला प्रश्न करणे ही त्यांची जबाबदारी आहे. ते म्हणाले की, सर्वोच्च न्यायालयाने वारंवार सांगितले आहे की, जोपर्यंत पत्रकार सरकारला न घाबरता प्रश्न विचारू शकतात तोपर्यंत देशात स्वातंत्र्य आहे.

प्रसारमाध्यमे हा या देशाचा चौथा स्तंभ आहे आणि तो आपल्या लोकशाहीचा अविभाज्य भाग आहे. त्यांनी आपले विचार व्यक्त केले. त्यांनी मोदी सरकारच्या दोन मंत्र्यांच्या उपस्थितीत, अशा प्रकारे आरसा दाखवला आणि ते म्हणाले की सुप्रीम कोर्टाने असे अनेक निर्णय दिले आहेत ज्यामध्ये पत्रकार कोणत्याही धैर्याशिवाय सत्तेवर प्रश्न करू शकतात आणि पत्रकारांच्या सुरक्षेसाठी आम्ही त्यात संपूर्ण तरतूद केली आहे. न्यायमूर्तींनी पत्रकारितेच्या खऱ्या माणसांनी कसं सांगावं हे सांगितलं. भारतीय जनता पक्षाच्या कमकुवत जीवावरही त्यांनी हल्ला चढवला. खोटारडेपणावर हल्ला चढवला. फेक न्यूज समुदायांमध्ये तणाव निर्माण करते. फेक न्यूजचा सतत प्रसार केवळ लोकशाहीलाच हानी पोहोचवत नाही तर काहीवेळा लोकशाहीला विनाशाच्या उंबरठ्यावर आणते. परंतु काल भारतीय एक्सप्रेसच्या कार्यक्रमात तिथले संपादक कमल झा यांनी सरकारला आरसा दाखवला. ते म्हणाले की सर्वोच्च न्यायालय आम च्यासाठी आशेचा किरण आहे. त्यांनी सर्वोच्च न्यायालयाची तुलना आशेचा किरण अशी केली. ते म्हणाले की, जेव्हा जेव्हा पत्रकारांवर गुन्हा दाखल होतो तेव्हा आपण नेहमी सर्वोच्च न्यायालयाकडे बघतो, पण तुम्हाला माहिती आहे की, जेव्हा त्यांनी आपल्या भाषणाची सुरुवात केली तेव्हा ते अतिशय मनोरंजक पद्धतीने म्हणाले की आज आपण जे काही बोलू, ते बंद लिफाफ्यात काहीही असणार नाही. मोदी सरकारला वन रँक वन पेन्शनची संपूर्ण बाब एका बंद लिफाफ्यात गुप्तपणे सांगायची होती, तेव्हा मी बंद लिफाफा सहन करणार नाही, असे न्यायमूर्ती डी चंद्रचूड यांनी मोदी सरकारला खडसावले. तेंव्हा नाईलाजाने मोदी सरकारला आपल्या सैनिकांना त्यांच्या थकित पेन्शनसाठी आम्ही २८००० करोड देऊ शकत नाही. असे सरकारला म्हणायचे होते, मोदी सरकारचा कसा पर्दाफाश झाला ते लक्षात ठेवायला हवे आहे.

चंद्रचूड साहेबांचे दोन निर्णय कसे मोदी सरकारसाठी अडचणी निर्माण करू शकतात, सध्या भाजपची प्रचार यंत्रणा त्यामुळे घाबरलेली आहे, कालच चंद्रचूड साहेबांच्या न्यायालयाचा निर्णय आला होता. बिलकीस बानो बलात्काराच्या दोषींना सजा पूर्ण होण्याआधीच गेल्या १५ ऑगस्टला जेलमधून सोडण्यात आले होते. या प्रकरणाची सुनवाई न्यायमूर्ती डी चंद्रचूड यांच्यासमोर होणार आहे.

गुजरात निवडणुकीआधी ११ जणांना कसे सोडण्यात आले आणि या ११ जणांवर अतिशय गंभिर आरोप होते. जगनने कसे मारले. बिलकिस बानोच्या डोळ्यासमोर तिच्या तीन ते पाच वर्षाच्या मुलीची हत्या करण्यात आली. बिलकिस बानोवर सामूहिक बलात्कार झाला. तिच्या डोळ्यासमोर तिच्या कुटुंबातील अनेक सदस्यांना ठार मारण्यात आले होते. ज्या अकरा जणांनी हा गेम खेळला होता आणि जे आरोपी होते. ज्यांच्यावर गुन्हा दाखल झाला होता त्यांना गुजरात सरकारने व्यवस्थेतील त्रुटीखाली ११ जणांची सुटका कशी केली? ते आपल्या समोर आहे

काही वर्षांपूर्वी दिवंगत अर्थमंत्री अरुण जेटली यांनी एक गुप्त निवडणूक बोनस आणला होता. सोप्या शब्दात सांगायचे तर, कोणीही व्यक्ती कोणत्याही पक्षाला आपले पैसे देऊ शकते. म्हणजे काळापैसा देऊ शकतो, याला भारतीय रिझर्व्ह बँकेने विरोध केला होता. तसेच निवडणूक आयोगाने आणि भारतीय रिझर्व्ह बँकेने दोघांनीही एकमताने सांगितले होते की या बोनसमुळे सत्ताधारी पक्षाला फायदा होईल आणि विरोधकांचे नुकसान होईल, आणि भारतीय जनता पक्षाला निवडणूक बोनसच्या स्वरूपात ९० टक्के फायदा झाला आहे.

विरोधी पक्षांची सरकारे कशी पाडली गेली याचा कधी विचार केला आहे का? हा घोडेबाजार कसा होतो? विरोधी पक्षाच्या आमदारांना आधी मुंबईतून गुजरातला नेले जाते आणि नंतर चार्टर्ड फ्लाईटने विधानसभेत नेले जाते आणि नंतर फाईव्हस्टार हॉटेलमध्ये ठेवले जाते. हा पैसा कुठून येतो याचा कधी विचार केला आहे का? आता सिक्रेट इलेक्टोरल बोनसवर गंभीर चर्चा सुरू होईल आणि या मुद्द्यावर जर सिक्रेट इलेक्टोरल बाँडच्या विराधात निर्णय आला तर ते भारतीय जनता पक्षाचे कंबरडे मोडल्यासारखे होईल. कारण, आजवर या सिक्रेट इलेक्टोरल बाँड्सचा बहुतांश पैसा भाजपकडे जात आहे आणि कोणत्याही उद्योगपतीने विरोधकांना पैसे दिले तर हे लोक त्यांच्या पद्धतीने ते शोधून काढायचे आणि मग त्यांना आयकर आणि ईडीची मदत देऊन त्रास दिला जात होता, ही वस्तुस्थिती सर्वांना माहीत आहे. सिक्रेट इलेक्टोरल बाँड्सवर अंकुश ठेवला किंवा त्यातील अनेक तरतुदींवर अंकुश ठेवला गेला तर भाजपचे नुकसान नक्कीच होणार आहे.

# तोच खरा महिला दिन !

८ मार्च हा जागतिक महिला दिन म्हणून जगभर साजरा केला जातो. भारतातही या दिवसाची विशेष क्रेझ असते. आपल्या कर्तृत्वाने नावलौकिक मिळवलेल्या स्त्रियांचा या दिवशी विविध कार्यक्रमांतून, वृत्तवाहिन्यांतून, वृत्तपत्रांतून गौरव केला जातो. महिला दिनाच्या निमित्ताने ऑनलाईन विक्रीच्या संकेतस्थळांवरसुद्धा महिलांसाठी विशेष सवलती दिल्या जातात. खासगी कार्यालयांतून महिला अधिकाऱ्यांचा गौरव केला जातो, हे सर्व पाहिल्यावर एक प्रश्न पडतो कि स्त्री ही केवळ एक दिवस गौरवण्याची बाब आहे का ? या भारतभूमीचा, येथील प्राचीन हिंदू संस्कृतीचा अभ्यास केल्यास येथे स्त्रीला नेहमीच सर्वोच्च स्थान दिले गेल्याचे लक्षात येईल. हिंदू धर्मशास्त्राने स्त्रीला शक्तिरूप मानले आहे. कोणतेही कार्य असो वा संकल्प, त्यासाठी शक्ती अनिवार्य आहे. शक्तीविना कोणताही जीव अथवा वस्तू निर्जीव स्वरूप असते. शक्तीचा सन्मान करणारी या देशात ५१ शक्तिपीठे आहेत , त्यांतील साडेतीन शक्तिपीठे आपल्या महाराष्ट्रात आहेत. सज्जनांच्या रक्षणार्थ आणि दुष्टांच्या संहारार्थ शक्तीने आपले मारक रूप वेळोवेळी प्रकट करून असुरी शक्तीचा विनाश केल्याचे आपण धार्मिक कथांतून, मालिकांतून वाचले आणि पाहिले आहे. ज्या दुष्ट शक्तींपुढे देवताही हतबल झाल्या अशांचा नाश देवींनी आपल्या अगाध सामर्थ्याने केला आहे. रामायण घडले ते माता सीतेच्या हरणामुळे, महाभारत घडले द्रौपदीच्या अपमानामुळे. स्त्रीचा सन्मान करण्याची आणि तिच्या रक्षणासाठी सर्वस्व पणाला लावण्याची शिकवण येथील संस्कृती आपल्याला देते. वीरमाता जीजाउंनी शिवाजी महाराजांना बालपणीच शौर्याचे, अन्यायाच्या प्रतिशोधाचे, जनतेचे सर्वस्वी कल्याणाचे बाळकडू पाजले नसते, तर कदाचित या देशाला हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवराय लाभले नसते. एव्हढा गौरवशाली इतिहास ज्या भारतभूमीला लाभला आहे त्या भारतात आज स्त्रियांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर होत चालला आहे.

गेल्या काही वर्षांमध्ये स्त्री अत्याचाराच्या घटनांमध्ये कमालीची वाढ झाली आहे. बलात्कार, विनयभंग, अपहरण, कौटुंबिक हिंसाचाराच्या घटनांमध्ये दिवसागणिक वाढ होत आहे. सप्टेंबर २०२३ मध्ये महाराष्ट्र पोलिसांच्या संकेतस्थळांवर प्रसिद्ध करण्यात आलेल्या आकडेवारीनुसार म हिलांसंदर्भातील गुन्ह्यांमध्ये राज्यात मुंबई आघाडीवर असल्याचे लक्षात येते. अन्य जिल्ह्यांच्या तुलनेत स्त्री अत्याचाराचे गुन्हे मुंबईत चार पटीने वाढले आहेत. २०२३ वर्षाच्या सुरुवातीपासून पुढील आठ महिन्यांत मुंबईत विनयभंग, छेडखानीच्या १ हजार २५४ घटना घडल्या होत्या. याच कालावधीत ५४९ महिला-तरुणींवर बलात्कार झाल्याच्या गुन्ह्याची नोंद मुंबई पोलिसांनी केली होती. केवळ ८ महिन्यांतील ही आकडेवारी पाहता मुंबईत महिला किती असुरक्षित आहेत याची कल्पना येते. मुंबई पाठोपाठ पुण्याची अवस्थाही याहून वेगळी नाही. राज्याची सांस्कृतिक राजधानी म्हणून ओळख असलेल्या पुण्यात आठ महिन्यांत छेडखानी केल्याच्या ३६४ घटना घडल्या, तर १२४ महिलांवर बलात्कार झाल्याचे गुन्हे दाखल करण्यात आले. पुण्यापाठोपाठ नागपूरमध्येही स्त्री अत्याचाराच्या घटनांम ध्ये ८ महिन्यांत कमालीची वाढ झाली आहे. अत्याचाराला बळी पडलेल्यांम ध्ये शाळकरी आणि महाविद्यालयीन मुलींची संख्या अधिक आहे. महिला अत्याचारांच्या घटनांच्या बाबतीत बदनामीच्या भयापोटी किंवा अन्य दबावामुळे सर्वच गुन्ह्यांची नोंद पोलीस दरबारी होत नाही त्यामुळे प्रत्यक्ष हा आकडा यापेक्षा कितीतरी अधिक असू शकतो.

राज्यातील स्त्री अत्याचाराच्या वाढत्या घटना मनाला अस्वस्थ करणाऱ्या आहेत. पोलीस असो, शिक्षण असो वा वैद्यकीय क्षेत्र कोणतेच क्षेत्र आज महिलांसाठी सुरक्षित राहिलेले नाही. ज्या क्षेत्रांवर महिला डोळे झाकून विश्वास ठेवत असत त्या क्षेत्रातही वासनांधांचा भरणा झाला आहे. स्त्री मग ती कोणत्याही वयाची असो, आज सुरक्षित राहिलेली नाही. चरितार्थ चालवण्यासाठी नोकरीनिमित्त घराबाहेर पडणारी स्त्री खासगी कंपन्यांतील लैगिक शोषणाला बळी पडू लागली आहे. नात्यातील मंडळींकडून केल्या जाणाऱ्या शोषणाचे प्रमाणही वाढू लागले आहे. स्त्रीच्या निर्बलतेचा फायदा घेऊन संधी साधण्यासाठी टपून बसलेल्या वासनांधांची संख्या समाजात वाढू लागली आहे. स्त्री अत्याचारविरोधी कायदे अधिक कठोर करूनही स्त्री अत्याचारांच्या घटनांध्ये तिळमात्र घट न होता वाढच होत चालली आहे. राज्यात महिला अत्याचाराचे ९६ टक्के, बलात्काराचे ९८.४९ टक्के आणि अल्पवयीनांवरील अत्याचाराचे ९९ टक्के गुन्हे उघडकीस आल्याची माहिती राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नुकतीच आपल्या अधिकृत खात्यावरून दिली. माननीय उपमुख्यमंत्र्यांनी उघडकीस आलेल्या गुन्ह्यांची माहिती दिली असली तरी उघडकीस आलेल्या गुन्ह्यांपैकी किती गुन्हे न्यायालयात तग धरतात आणि किती गुन्हेगारांना शिक्षा मिळते याबाबत फडणवीस सांगू शकतील का ? गुन्हेगारी कृत्यांना चाप बसण्यासाठी आणि गुन्ह्यांची मीमांसा करून गुन्हेगारांना दंडित करण्यासाठी देशात न्यायपालिका कार्यरत आहे; मात्र न्यायपालिकेचा रटाळ कारभार, यादरम्यान गुन्हेगारांना पुरावे नष्ट करण्यास मिळणारी मोकळीक, पोलिसांवरील राजकीय दबाव, पोलीस व्यवस्थेतील भ्रष्टाचार यांमुळे उशिरा मिळाला तरी तो न्याय असेलच याची शाश्वती नसते. महिला अत्याचारांच्या घटना रोखण्यासाठी राज्यात दामिनी आणि निर्भया पथक कार्यरत आहेत. मात्र स्त्री अत्याचाराचा वाढता आलेख पाहता त्यांना अधिक सक्षम करण्याची आज आवश्यकता आहे. बलात्कारासारख्या घटनांमध्ये गुन्हेगारांना शिक्षा मिळण्याचे प्रमाण आपल्याकडे अगदीच नगण्य आहे, परिणामी गुन्हेगारांमधील भय लुप्त होत चालले असून अशा स्वरूपाचे गुन्हे गेल्या काही वर्षांत कमालीचे वाढले आहेत. रांझेगावच्या पाटलाने एका अबला स्त्रीवर अत्याचार केल्याचे कळताच छत्रपती शिवाजी महाराजांनी त्याचे हात पाय तोडण्याचे आदेश देऊन अशा गुन्ह्यांविषयी रयतेमध्ये कायम स्वरूपी भय निर्माण केलेच शिवाय स्वराज्यातील स्त्रियांनाही सुरक्षित केले. स्त्री अत्याचारांच्या गुन्ह्यांमध्ये तत्परतेने आणि कठोर शासन केले गेले तरच गुन्हेगारांमध्ये भय निर्माण होते, हेच या प्रसंगातून सिद्ध होते. त्यामुळे स्त्री अत्याचाराचा चढता आलेख थांबवायचा असेल तर शिक्षाही स्वराज्याप्रमाणेच असायला हवी.

आजच्या स्त्रीपुढे कोण्या मॉडेलचा किंवा नटीचा आदर्श असून चालणार नाही. आजच्या स्त्रीपुढे आदर्श हवा आपल्या पराक्रमाने शत्रूला नामोहरम करणाऱ्या झाशीच्या राणीचा, अहील्याबाई होळकरांचा, वीरमाता जिजाऊंचा, राणी पद्मिनीचा आणि राणी चेन्नम्माचा. जेव्हा प्रत्येक स्त्री स्वतः चे रक्षण करण्यास सक्षम होईल, तेव्हा कोणाची हिम्मत होणार नाही तिच्याकडे वाकड्या नजरेने पाहण्याची. यासाठी प्रत्येक शाळेमधून मुलींसाठी स्वरक्षण प्रशिक्षणाचे नियमितपणे धडे दिले जावेत. येणाऱ्या प्रतिकूल प्रसंगाला कसे सामोरे जावे आणि त्याचा प्रतिकार कसा करावा याचे अद्यावत ज्ञान प्रत्येक मुलीला शालेय जीवनापासूनच दिले जावे. जेणेकरून आज नाहीतर येणाऱ्या काही वर्षांत याचे सकारात्मक परिणाम आपल्याला नक्कीच दिसतील. राज्य सरकरने यासाठी पुढाकार घेण्याची आवश्यकता असून स्वरक्षणासाठी सिद्ध होणाऱ्या मुली भविष्यात समाजातील वाढत्या स्त्री अत्याचारावर नक्कीच अंकुश आणू शकतात. ज्या दिवशी स्त्री अत्याचाराच्या आलेखला उतरती कला लागेल, ज्या दिनी स्त्रियांविषयी सन्म ानाची भावना समस्त समाजात निर्माण होईल तोच खऱ्या अर्थाने महिला दिन असेल.



**जगन घाणेकर,**
**घाटकोपर, मुंबई**
**संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०**

# तिचा वारसा' अनावरण : विविधता, एकता आणि महिलांच्या सक्षमीकरणाचा अनोखा सोहळा

कला, संस्कृती आणि सक्रियतेचा अभूतपूर्व मिलाफ साधत रुमिकेअर हेल्प युअरसेल्फ फाऊंडेशन आणि रिझवी एज्युकेशन सोसायटी यांनी 'हर लिगेसी' हा महिला दिन साजरा करताना अभिमान व्यक्त करत आहे. रिझवी लॉ कॉलेज, रिझवी एज्युकेशनल कॅम्पस, वांद्रे पश्चिम, मुंबई च्या पार्श्वभुमीवर आधारित 'तिचा वारसा' हा कार्यक्रम शुक्रवार ८ तारखेला दुपारी १२ ते ४ रंगणार आहे

या कार्यक्रमाची ठळक वैशिष्ट्ये पुढील प्रमाणे आहेत.

- थ्रेड्स ऑफ रेझिलिएंसी : प्रतिकूल परिस्थितीवर मात करून विजय मिळवणाऱ्या महिलांच्या कथांचा समावेश असलेले मल्टी मीडिया प्रदर्शन.
- सर्जनशीलतेचा कॅनव्हास: लाइव्ह आर्ट इन्स्टॉलेशन : महिला कलाकारांचे सादरीकरण, सायबा डान्स ॲकॅडमीच्या मंत्रमुग्ध करणारे नृत्य सादरीकरण, त्यांच्या अनोख्या दृष्टीकोन आणि प्रतिभेचे प्रदर्शन.
- विशेष महिलांचा सत्कार : रिझवी एज्युकेशन सोसायटीतर्फे आपल्या समाजातील अपवादात्मक महिलांना भावपूर्ण श्रद्धांजली, त्यांच्या उल्लेखनीय योगदानाचा आणि कर्तृत्वाचा गौरव करण्यात येणार आहे.
- युनिटी विव्ह: एक संवादात्मक उपक्रम जिथे उपस्थित लोक एकतेच्या सामर्थ्याचे प्रतीक असलेल्या सहयोगी कलाकृतीमध्ये त्यांच्या स्वत: च्या कथा आणि अनुभव योगदान देऊ शकतात.



महिलांच्या वैविध्याचा आणि लवचिकतेचा उत्सव साजरा करण्याबरोबरच 'तिचा वारसा' नव्या मोहिमेच्या माध्यमातून बाल शोषणाच्या तातडीच्या मुद्द्यावरही प्रकाश झोत टाकणार आहे. जनजागृती करणारे उपक्रम आणि शैक्षणिक उपक्रमांच्या माध्यमातून उपस्थितांना बाल शोषणविरोधी लढ्यात सहभागी होण्यासाठी आणि सर्वत्र मुलांचे हक्क आणि संरक्षणासाठी वकिली करण्यासाठी आमंत्रित केले जाईल.

आम्ही तिच्या वारशाचे अनावरण करताना रोमांचित आहोत - एक उत्सव जो सीमा ओलांडतो आणि कला, संस्कृती आणि सक्रियतेला एकत्र आणतो, ते म्हणाले. ॲड.रुबीना अख्तर हसन रिझवी, हेल्प युअरसेल्फ फाऊंडेशनच्या संस्थापक आणि रिझवी एज्युकेशन सोसायटीच्या संचालिका. आमचे ध्येय अशी जागा तयार करणे आहे, जिथे महिलांना एकजूट, प्रेरणा आणि सक्षमीकरण मिळू शकेल, तसेच आमच्या समुदायावर परिणाम करणार्या महत्त्वपूर्ण सामाजिक सम स्यांकडे लक्ष दिले जाईल. तिचा वारसा सर्व लिंग आणि पार्श्वभूम ीच्या व्यक्तींसाठी खुला आहे, प्रत्येकाला आमंत्रित करतो विविधता, एकता आणि सक्षमीकरणाच्या उत्सवात सामील होणे. अधिक माहितीसाठी आणि तिचा वारसा येथे आपली जागा राखीव ठेवण्यासाठी, कृपया www.helpyourselffoundation.in भेट द्या किंवा infohelpyourselffoundation.com संपर्क साधा

स्त्रीत्वाचे जिवंत धागे विणताना, विविधतेचे सौंदर्य, एकतेची शक्ती आणि सक्रियतेचे सामर्थ्य साजरे करणारी एक टेपेस्ट्री तयार करताना आमच्यात सामील व्हा.

हेल्प युअरसेल्फ फाऊंडेशन आणि रिझवी एज्युकेशन सोसायटी यांनी आंतरराष्ट्रीय महिला दिन साजरा करण्यासाठी तिचा वारसा कटिबद्ध आहे.

**संपर्क - डॉ. साजन जी. पाटील**
**प्राचार्य रिझवी लॉ कॉलेज,**
**संपर्क-९८३३१७०१३८**

# सेंसॉर बोर्डासोबतच्या प्रदीर्घ लढ्याला मोऱ्याच्या निर्मात्या दिग्दर्शकांना यश!!

काही व्यक्ती अश्या असतात कि त्यांना प्रत्येक गोष्ट ही संघर्ष केल्यानेच मिळते. त्यात पहिला नंबर म्हणजे सफाई कामगार. त्यांच्या दिवसाची सुरुवातच मुळात जगातील दुर्गंधी साफ करण्यासोबत होते. अश्याच एका सफाई कामगाराचे आयुष्य रेखाटणाऱ्या 'मोऱ्या' चित्रपटाने चित्रपटातील नायका प्रमाणेच 'सेंसॉर प्रमाणपत्र' मिळविण्यासाठी प्रदीर्घ संघर्ष केला आहे. 'मोऱ्या'ची व्यथा माननीय मुख्यमंत्री एकनाथजी शिंदेसाहेबांना समजताच त्यांनी सेंसॉर अधिकाऱ्यांना फैलावर घेऊन समज दिली आणि त्यांनतर जवळपास तीन वर्ष सुरु असलेला हा प्रदीर्घ संघर्षाचा लढा संपून 'मोऱ्या' अखेर सेन्सॉरमुक्त झाला. ही लढाई सप्टेंबर २०२२ पासून सुरु होती, ती अखेर २७ फेब्रुवारी २०२४ रोजी संपुष्टात आली. यासाठी महाराष्ट्र टाइम्सचे ज्येष्ठ पत्रकार हर्षल मळेकर यांनी बातमीच्या माध्यमातून याची दखल घेत या विषयाकडे लक्ष वेधले. तर मीडिया असोसिएशन ऑफ इंडिया अर्थात माई या राष्ट्रीय संघटनेच्या राष्ट्रीय अध्यक्षा जेष्ठ महिला पत्रकार सौ. शीतल करदेकर आणि मुख्यमंत्र्यांचे खाजगी जनसंपर्क अधिकारी विराज मुळे यांनी विशेष पाठपुरावा करून हे प्रकरण मा. मुख्यमंत्री साहेबांच्या निदर्शनास आणून दिले. साहेबांनी लक्ष घालून तातडीने कारवाई करण्याच्या सूचना दिल्याने अखेर 'मोऱ्या' सेंन्सॉरमुक्त मुक्त झाला.

'टॉर्टुगा मोशन पिक्चर्स'ची निर्मिती असलेल्या या चित्रपटात एका सफाई कर्मचाऱ्यांची हृदयस्पर्शी कथा रेखाटण्यात आली असून ती अभिनेता जितेंद्र बर्डे यांनी आपल्या सहजसुंदर नैसर्गिक - संयमी अभिनयाने हुबेहूब उभी केली आहे. प्रमुख सहकलाकार उमेश जगताप, संजय भदाणे, धनश्री पाटील, राहुल रोकडे, सुरज अहिवळे, बालकलाकार रुद्रम बर्डे इत्यादींचा अभिनय आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर विविध पुरस्कार मिळविणारा आणि सफाई कामगाराच्या जीवनावर बेतलेला 'मोऱ्या' आता येत्या २२ मार्च २०२४ रोजी प्रदर्शित होणार आहे. विविध आंतरराष्ट्रीय महोत्सवांत 'उत्कृष्ट चित्रपटा'चा बहुमान मिळविणाऱ्या मोऱ्या चित्रपटगृहात जाऊन पहावा आणि मराठी अस्मिता जागवावी.

# महिला दिन आणि महिला सक्षमीकरण

प्रतिवर्षी जागतिक महिला दिन देशभर उत्साहात साजरा केला जातो. या दिवशी नेतेमंडळींकडून स्त्री पुरुष समानतेच्या, महिलांच्या सक्षमीकरणाच्या गोष्टी केल्या जातात, महिलांचा आदर करण्याचे सल्ले दिले जातात. महिलांच्या सन्मानार्थ शासकीय कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. वृत्तपत्रे आणि वृत्तवाहिन्यांतून कर्तृत्ववान महिलांचा गौरव केला जातो, या दिवशी अनेक दुकानांमध्ये, ऑनलाईन शॉपिंग साईट्सवर महिलांसाठी विशेष सवलत दिली जाते. या एक दिवशी महिलांना यथोचित सन्मान दिला जात असला तरी अन्य दिवसांतील महिलांविषयक गुन्ह्यांचा आलेख पाहता तो आजवर नेहमीच चढता राहिला आहे, दिवसागणिक समाजाचे होत चाललेले नैतिक अध:पतन ही चिंतेची बाब आहे. त्यावर आज उपाययोजना काढली नाही, तर भविष्यात स्त्रियांना समाजात वावरणेही कठीण होऊ शकते. त्यासाठी सर्वप्रथम अश्लील संकेतस्थळाच्या प्रसारणावर पूर्णतः बंदी आणणे आवश्यक आहे. वेब सिरीज, चित्रपट आणि जाहिरातींमध्ये अश्लील आणि कामुक दृश्ये दाखवण्यास प्रतिबंध घातला पाहिजे. बलात्कार आणि विनयभंगाच्या गुन्ह्यातील आरोपींना अश्लील मालिकांतून आणि दृश्यपटांतून प्रेरणा मिळत असल्याचे निरीक्षण संबंधित गुन्हेगारांच्या सर्वेक्षणातून एका संस्थेने समोर आणले आहे. त्यामुळे या बाबीकडे सरकारने गांभीर्याने पाहायला हवे. शाळा महाविद्यालयांतून नैतिक मूल्याचे शिक्षण अनिवार्य केले जावे आणि या विषयाच्या वर्गामध्ये थोरा मोठ्यांच्या चरित्रांसोबत रणरागिणी झाशीची राणी, राजमाता जिजाऊ, पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांसारख्या शूर आणि कर्तृत्ववान योध्यांची चरित्रे शिकवली गेली पाहिजेत. मुलींना शाळा महाविद्यालयांतून स्व-संरक्षणार्थ ज्युडो कराटेचे, लाठीकाठीचे प्रशिक्षण अनिवार्य केले पाहिजे. इतरांवर अवलंबून राहण्याऐवजी स्वतःच्या रक्षणाची जबाबदारी प्रत्येक स्त्रीने स्वतःच घेतली पाहिजे. हेच खऱ्या अर्थाने महिला सक्षमीकरण असेल.

**- सौ. मोक्षदा घाणेकर, काळाचौकी**

# 'ॐ नम: शिवाय' मनात असू द्या ...... कपड्यावर नको !



हल्ली 'ॐ नम: शिवाय ।' हा मंत्रजप लिहिलेले सदरे, शर्ट्स तयार कपड्यांच्या दुकानात विक्रीला ठेवलेले पाहायला मिळतात. महाशिवरात्र आणि श्रावण महिन्याच्या दरम्यान ऑनलाईन संकेतस्थळांवरसुद्धा अशा कपड्यांची मागणी मोठ्या प्रमाणात वाढते. बारा ज्योतिर्लिंग तसेच भगवान शिवाची पुरातन मंदिरे ज्या ठिकाणी आहेत अशा ठिकाणी या स्वरूपाच्या कपड्यांचे स्टॉल्स पाहायला मिळतात. महा शिवरात्रीनिमित्त प्राचीन शिवमंदिराच्या ठिकाणी भरणाऱ्या जत्रांमध्ये सुद्धा 'ॐ नम: शिवाय ।' मंत्रजप छापलेले कपडे विक्रीसाठी ठेवलेले दिसून येतात, ज्यांना तरुणवर्गाकडून अधिक पसंती दिली जाते. अंगभर ॐ नम: शिवाय । हा मंत्रजप लिहिलेले सदरे परिधान करण्याची आता जणू फॅशनच येत चालली आहे. जीन्स पॅन्टवर अशा प्रकारचे सदरे घातलेले तरुण हल्ली सर्वत्र पाहायला मिळतात. 'ॐ नम: शिवाय ।' हा भगवान शिवाचा मंत्रजप असून याच्या नियमित स्मरणाने शिव प्रसन्न होऊन आपली मनोकामना पूर्ण करतो असे म्हटले जाते. यामध्ये ओम हा बीजमंत्र असल्याने या मंत्रात शक्तीही तेव्हढ्या प्रमाणात सामावलेली असते. त्यामुळे तो श्रद्धेने स्मरावा असे धर्मशास्त्र सांगते. धर्मशास्त्रानुसार ज्या ठिकाणी देवतेचे नाम अथवा प्रतिमा असते त्या ठिकाणी त्या देवतेचे शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध आणि त्या देवतेची शक्ती कार्यरत असते. ॐ नम: शिवाय। सारख्या या शक्तिशाली मंत्राचा हल्ली कपड्यांवर होत असलेला सुमार वापर मनाला खटकणारा आहे. मंत्रजप छापलेले कपडे घालून आपण आवश्यक ती शुचिर्भूतता पाळतो का ? अशा प्रकारचे कपडे परिधान करून आपण कोणत्याही अपवित्र स्थळी जात असू, मद्यपान, धूम्रपान करत असू, मुक्तपणे वावरत असू तर तो प्रत्यक्ष शिवाचाच अवमान आहे. अंगाला येणाऱ्या घामा मुळे घातलेल्या कपड्यांना दुर्गंध येऊ लागतो. असे कपडे अन्य कपड्यांसोबत धुतांनाही आपण विशेष काळजी घेत नाही. एकीकडे आपली शिवभक्ती दाखवण्यासाठी अशा प्रकारचे कपडे घालायचे आणि दुसरीकडे प्रत्यक्ष शिवाचाच अवमान करायचा अशाने शिवाची कृपा आपल्यावर होईल का ? भक्ती ही मनापासून करावी, त्यासाठी हिंदू धर्मात अनेक मार्ग सांगण्यात आले आहेत. अशा प्रकारे मंत्रजपाचे कपडे परिधान करून आपल्या भक्तीचा देखावा करू नये. अशा प्रकारचे कपडे तयार करून ते विक्रीसाठी ठेऊन व्यापारी वर्ग आपला व्यवसाय वाढवू पाहतात आणि आपल्यासारखे भगवान शिवाचे भक्त हे कपडे चढ्या दरात विकत घेतात. त्यामुळे भगवान शिवाचा मंत्रजप छापलेले कपडे विकत घेणे आणि ते परिधान टाळायला हवे !

**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०**

**दैनिक सिंधुदुर्ग समाचार (मुख्य आवृत्ती सिंधुदुर्ग)** : संस्थापक, संपादक कै.प्राचार्य मुकुंदराव कदम (MA,LLB), मालक, मुद्रक, प्रकाशक : ॲड.रूपाली मुकुंद कदम डांगे (BSL,LLB,MCA) R.N.INo. 43711/85 संपादक : अँड रूपाली मुकुंद कदम डांगे मुद्रणस्थळ : न्यु विक्रम मुद्रणालय, एम/एस विक्रम मुद्रणालय १०३ मेन रोड, कणकवली जि. सिंधुदुर्ग, येथे छापून प्रकाशन स्थळ/कार्यालय : एम/एस विक्रम मुद्रणालय १०३ मेन रोड, कणकवली जि. सिंधुदुर्ग, महाराष्ट्र-४१६००२ येथे प्रकाशित केले. मुद्रणस्थळ : एम/एस विक्रम मुद्रणालय १०३ मेन रोड, कणकवली जि. सिंधुदुर्ग, महाराष्ट्र-४१६००२, उपसंपादक : विक्रम मुकुंद कदम, कार्यकारी संपादक मंडळ : प्रा. ऊज्वला कदम राठौर, डॉ.शर्मिला कदम राजपुत, ई मेल-कार्यालयीन पत्रव्यवहारासाठी व जाहिरातीसाठी संपर्क : rupasamachar@gmail.com, बातमी व फोटोसाठी संपर्क sindhudurg.samachar@gmail.com सिंधुदुर्ग-फोन: (०२३६७) २३१९२५, फॅक्स-२३२१०१ वेंगुर्ला : बी.के.रोड फोन : २६३७४६, मुंबई/पुणे फोन : ९८२२९७९७३२, रत्नागिरी : गाळा नं. ३८, २ रा मजला, कोल्हापूर अरिहंत अर्पाटमेंट फोन : (०२३१) २५२३००५ मुंबई संपर्क कार्यालय सत्यवान बिल्डींग पडवळनगरए ठाणे (वेस्ट)४००६०४

# उमेदवारी हवी तर कमळ चिन्हावर लढा, शिंदे गटाच्या अनेकांना भाजपचा सल्ला

**मुंबई । प्रतिनिधी**

शिवसेनेच्या शिंदे गटाला ८ , तर राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटाला ४ जागा देण्याचा प्रस्ताव ठेवत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी या आपल्या मित्रपक्षांना जबर धक्का दिला. शिंदे आणि अजित पवार हे दोन्ही गट या धक्क्याने अस्वस्थ झाले असून, पुन्हा दिल्ली दरबारी जाऊन चर्चा करण्याची तयारी त्यांनी चालवली आहे.

त्यातही एक दिलासा देणारा मार्ग शहा यांनी दाखवून ठेवला आहे. शिंदे गटाच्या काही उमेदवारांना भाजपच्या तिकिटावर लढावे लागेल, असेही शहा यांनी शिंदे गटाला सांगितल्याचे समजते.

मंगळवार आणि बुधवार असा दोन दिवसांचा दौरा करून अमित शहा दिल्लीला रवाना झाले. मंगळवारी रात्री सह्याद्री अतिथीगृहावर त्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याशी उशिरापर्यंत खलबते केली. शहा यांनी मुख्यमंत्री शिंदे यांच्याशी स्वतंत्र चर्चादेखील केली. बुधवारी चौघा नेत्यां मध्ये ही चर्चा पुन्हा पुढे सुरू राहिली.

जिंकण्याची खात्री या एकमेव निकषावर भाजपने आपली यादी तयार केली आहे. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपने २५ जागा लढल्या होत्या. यावेळेस या २५ जागांशिवाय आणखी ११ जागा भाजपला हव्या आहेत. सर्वेक्षणाच्या अहवालानुसार ३६ जागा स्वतःकडे ठेवण्याची भाजपची सुरुवातीपासून रणनीती होती.

मित्रपक्षांच्या आग्रहानंतर भाजपने ३२ पर्यंत खाली येण्याची तयारी दर्शविली होती. मात्र, शिंदे गटाच्या खासदारांबाबत वाढती नकारात्मकता आणि त्यांच्या आमदारांच्या वर्तना मुळे ही नकारात्मकता वाढत असल्याचे लक्षात आल्याने भाजपने आपली भूमिका बदलली आणि ३६ किंवा ३७ जागांचा भाजपचा आग्रह आता कायम ठेवला आहे.

उर्वरित सात-आठ जागा शिंदे गटाला आणि तीन ते चार जागा अजित पवार गटाला सोडण्यास भाजप तयार असल्याचे समजते. नरेंद्र मोदी यांना तिसर्यांदा पंतप्रधान करण्यासाठी सर्वांनी कामाला लागावे, अशा सूचना अमित शहा यांनी भाजपसह शिवसेना आणि राष्ट्रवादीला दिल्या. यंदाच्या निवडणुकीत 'एनडीए'साठी ४०० पारचे उद्दिष्ट भाजपने नक्की केले आहे. त्यामुळे जागावाटपात कोणतीच जोखीम न पत्करण्याची भाजपची भूमिका आहे. भाजपने केलेल्या विविध सर्वेक्षणांनंतर शिंदे आणि अजित पवार गटाचे उमेदवार जिथे हमखास विजयी होतील, त्याच जागा मित्रपक्षांना सोडण्याचे भाजपचे धोरण असल्याचे शहा यांनी ऐकवले. जागांच्या मागणीवर अडून न बसता हमखास जिंकू अशाच जागा घ्या, जागांची मागणी महत्त्वाची नाही;

तर सर्वेक्षणाचा अहवाल महत्त्वाचा आहे, असे शहा यांनी स्पष्ट शब्दांत सुनावल्याचे विश्वसनीय वृत्त आहे. आम च्या सर्वेक्षण अहवालात अनेक जागा अडचणीच्या दिसताहेत. तिथे एक तर उमेदवार बदलावा लागेल किंवा पक्ष. या अदलाबदलीची तयारी ठेवा, असेही अमित शहा यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांना सांगितले.

शिंदे गटाने विद्यमान १३ खासदारांसह आणखी तीन जागांची मागणी केली आहे. एकीकडे, शिंदे गटाकडून १६ जागांसाठी आग्रह चालू असताना भाजप नेतृत्वाने मात्र सर्वेक्षणाचा हवाला देत शिंदे गटाला पाच विद्यमान खासदारांच्या जागांवरचा दावा सोडण्याचा सल्ला दिला आहे. शिंदे गटाला जितक्या जागा तितक्याच आम्हाला, अशी भूमिका राष्ट्रवादीने जाहीर केली होती. जवळपास आठ ते बारा जागांसाठी अजित पवार गट प्रयत्नशील होता. मात्र, राष्ट्रवादीच्या वाट्याला चार जागा येण्याची शक्यता आहे.

मुंबईत अमित शहा यांच्या उपस्थितीत महायुतीच्या बैठका झाल्यानंतर प्रदेश भाजपचे कोअर कमिटीचे नेते दिल्लीला रवाना झाले. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, मुंबई भाजपाध्यक्ष आशिष शेलार, उच्चशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील आणि विधान परिषदेतील गटनेते प्रवीण दरेकर हे दिल्लीसाठी रवाना झाले . महाराष्ट्रातील जागावाटपावर त्यांच्या बैठकीत अंतिम निर्णय होण्याची शक्यता आहे.

## माधवराव पवार विद्यालय कोकिसरेचे शिक्षक स्वप्निल पाटील 'राज्यस्तरीय उत्कृष्ट विज्ञान' पुरस्काराने सन्मानित

**वैभववाडी । प्रतिनिधी**



वैभववाडी तालुक्यातील श्री माधवराव पवार विद्यालय कोकिसरे या प्रशालेत विज्ञान शिक्षक म्हणून कार्यरत असणारे स्वप्निल श्रीकांत पाटील यांना अविष्कार फाउंडेशन इंडिया तर्फे राज्यस्तरीय उत्कृष्ट विज्ञान शिक्षक गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. संपूर्ण देशभरात २८ फेब्रुवारी हा दिवस राष्ट्रीय विज्ञान दिन म्हणून साजरा केला जातो. यानिमित्ताने राज्यातील विज्ञान शाखेत कार्य करणाऱ्या शिक्षकांचा सन्मान सोहळा आविष्कार फाउंडेशन मार्फत आयोजित करण्यात आला होता. विज्ञान शिक्षक म्हणून शैक्षणिक क्षेत्रात केलेल्या व करत असलेल्या कार्याची दखल घेऊन सन २०२३-२४ साठी हा राज्यस्तरीय उत्कृष्ट विज्ञान शिक्षक पुरस्कार देण्यात आला. हा गौरव वितरण सोहळा शाहू स्मारक भवन दसरा चौक कोल्हापूर येथे रविवार दिनांक ३ मार्च २०२४ सकाळी पार पडला या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे प्रा. डॉ. सुरेंद्र हेरकळ हे होते तर अध्यक्षस्थानी प्राध्यापक किसनराव कुराडे, संयोजन श्री.रंगराव सूर्यवंशी यांनी केले तर आयोजन संजय पवार यांनी केले होते. स्वप्निल पाटील सर हे सतत शैक्षणिक क्षेत्रात नवनवीन उपक्रम विद्यार्थ्यांसाठी राबवत असतात. स्कॉलरशिप, एनएमएमएस परीक्षा, अपूर्व विज्ञान मेळावा, विज्ञान प्रदर्शन, विज्ञान नाट्य उत्सव, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन या माध्यमातून सतत त्यांचे गणित विज्ञान विषयक कार्य वैभववाडी तालुका व सिंधुदुर्ग जिल्ह्यात अव्याहत चालू आहे. ते शिक्षक भारती संघटनेचे वैभववाडी तालुका सचिव, सिंधुदुर्ग जिल्हा विज्ञान मंडळाचे कार्यकारिणी सदस्य तसेच सिंधुदुर्ग जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी पतपेढीचे संचालक म्हणून काम पाहत आहे. सदर पुरस्कार मिळाल्याबद्दल श्री स्वप्निल श्रीकांत पाटील यांचा शिक्षक भारती वैभववाडी चे अध्यक्ष श्री अविनाश शामराव कांबळे, माजी जिल्हा उपाध्यक्ष श्री दिनकर पाटील, सचिव श्री संजयकुमार खिमा आडे, संघटक श्री रामचंद्र शिवराम घावरे, श्री.राजाराम बिडकर सर, पदाधिकारी व सदस्य यांच्यातर्फे स्वप्निल श्रीकांत पाटील यांचा सत्कार करण्यात आला.

## शेतकऱ्यांवर आत्महत्येची वेळ आली हीच मोदींची गॅरंटी; शरद पवारांची बोचरी टीका



**पान १ वरून..**

वाढवतो. गेली दहा वर्षे मोदी सत्तेत आहेत, उत्पन्न वाढलं का? उलट शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढल्या. शेतकऱ्यांवर आत्म हत्या करण्याची वेळ आणली, हीच मोदींनी गॅरंटी दिली, असा हल्लाबोल शरद पवार यांनी केला.

शरद पवार म्हणाले, मविआची बैठक झाली आहे. पुढील आठवडाभरात आम्ही लोकसभेचे उमेदवार जाहीर करू. तुम्ही त्या उमेदवारांना निवडून द्या, तेव्हाच लोकशाहीचे रक्षण होईल असे आवाहन त्यांनी केले. सत्तेचा गैरवापर भाजप करत आहे.

झारखंड, दिल्ली या राज्यात तेच घडत आहे. नोटीस, समन्स द्यायचे आणि तुरुंगात टाकायचे, आता दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनाही लवकरच अटक केली जाईल.

मुंबईत आदर्श सोसायटीम ध्ये माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाणांचा हात आहे, असा आरोप भाजपाने केला. सातव्या दिवशी ते भाजपामध्ये गेले आणि पंधराव्या दिवशी ते भाजपाचे खासदार झाले.

राष्ट्रवादी काँग्रेस म्हणजे भ्रष्टवादी पक्ष , राज्य सहकारी बँक आणि जलसंपदा विभागात घोटाळा केला, असा आरोप मोदींनी केल्यावर मी म्हणालो हिंमत असेल, तर चौकशी करा. दूध का दूध आणि पाणी का पाणी होऊ दे. मोदींनी चौकशी करावी.

मात्र घडलं काय, ज्यांच्यावर आरोप केले, आज ते भाजपाम ध्ये आहेत. त्यामुळे भाजप म्हणजे वॉशिंग मशीन झालेली आहे. आरोप करा आणि त्यांना पक्ष प्रवेश देऊन आरोप धुवून काढा, असेही शरद पवार यांनी अधोरेखित केले.

## लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर नारायण राणेंना धक्का



**वरवडे । वार्ताहर**

केंद्रीय मंत्री नारायण राणे यांच्या वरवडे या मूळगावातील कादर खान व यासीन खान यांच्या नेतृत्वाखाली अनेक मुस्लिम बांधवांनी आज खासदार विनायक राऊत यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात प्रवेश केला.त्यामुळे नारायण राणेंना हा धक्का मानला जात आहे. कणकवली विजय भवन येथे खा. विनायक राऊत यांनी शिवबंधन बांधून प्रवेशकर्त्यांचे पक्षात स्वागत केले. एकीकडे सिंधुदुर्ग रत्नागिरी लोकसभा मतदार संघासाठी भाजपकडून नारायण राणेंना उमेदवारी मिळण्याची शक्यता असताना त्यांच्याच मूळ गावातील मुस्लिम बांधवांनी पक्षप्रमुख उद्धवजी ठाकरे यांच्या नेतृत्वावर विश्वास दाखवत शिवसेनेचा झेंडा हाती घेतला.

यावेळी शिवसेना जिल्हा प्रमुख संदेश पारकर, कणकवली विधानसभा प्रमुख सतीश सावंत, महिला जिल्हाप्रमुख नीलम पालव, युवासेना जिल्हाप्रमुख सुशांत नाईक, अल्पसंख्यांक सेलचे जिल्हाध्यक्ष अब्दुल मज्जिद अब्बास बटवाले, जिल्हासरचिटणीस निसार शेख, सचिन सावंत, शैलेश भोगले, प्रथमेश सावंत, कन्हैया पारकर, वैदेही गुडेकर, स्वरूपा विखाळे, अनुप वारंग, इमाम नावलेकर, विलास गुडेकर, सचिन आचरेकर, धनंजय सावंत, सिद्धेश राणे आदी पदाधिकारी शिवसैनिक उपस्थित होते.

**वेंगुर्ला नगरपरिषद कार्यालय,**
**तालुका - वेंगुर्ला, जिल्हा - सिंधुदुर्ग**
**जाहीर सुचना**

महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औदयोगिक नगरी अधिनियम सन १९६५ चे कलम १०३ अन्वये वेंगुर्ला नगरपरिषदेचे सन २०२३-२०२४ चे सुधारीत व सन २०२४-२०२५ चे अनुमानित अंदाजपत्रक हे वेंगुर्ला शहरातील कोणत्याही प्रौढ रहिवाश्यास पाहण्यासाठी नगरपरिषदेच्या कार्यालयीन वेळेत पूर्ण १५ दिवस खुले ठेवण्यात आलेले आहे.

सही/- प्रशासकीय अधिकारी
नगरपरिषद वेंगुर्ला

## पान १ वरून

### फोंडा घाटामध्ये विद्युत केबल वाहतूक करणारा कंटेनर पलटी

गोव्याच्या दिशेने विदयुत केबल ची वाहतूक करत असताना फोंडाघाट बाजारपेठ पासून सुमारे ५ किमी अंतरावरील फोंडा घाटातील अवघड वळणावर सकाळी १०:३० च्या दरम्याने आला असताना चालकाचा गाडीवरील ताबा सुटल्याने विदयुत केबल च्या ड्रम ने भरलेला कंटेनर रस्त्याच्या मधोमध पलटी झाला त्यामुळे फोंडाघाट कोल्हापूर मार्गांवरील वाहतूक ठप्प झाली होती त्यामुळे काही तास वाहनाच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. सुदैवाने कंटेनर चालकाला कोणतीही दुखापत झाली नाही . सदर घटना समजताच फोंडाघाट चेक पोस्ट वर असणारे पोलीस कॉन्स्टेबल मारुती बारड यांनी घटनास्थळी जाऊन वाहतूक सुरळीत केली यावेळी महामार्ग वाहतूक चे पोलीस हवालदार राजेश ठाकूर हवालदार नितीन चोडणकर पोलीस कॉन्स्टेबल महादेव साबळे, हवालदार उत्तम वंजारे याचबरोबर बांधकाम विभागचे कर्मचारी शाहू शेळके उपस्थित होते.

### निवडणूक रोखे प्रकरणात सीबीआय अडचणीत; सुप्रिम कोर्टात अवमान याचिका दाखल

यासाठी सुरू असलेल्या प्रयत्नांना खीळ घालण्यासाठी मुदतवाढ मागितली आहे, असेही या याचिकेत म्हटले आहे. स्टेट बँकेकडे माहिती तंत्रज्ञानाचे मोठे जाळे आणि सर्व शाखा एकमेकांशी जोडलेल्या आहेत, असे असताना २२२१७ इतक्या इलेक्ट्रोल बाँडची माहिती वेळेत देता न येणे ही भाबा न पटणारी आहे, असेही या याचिकेत म्हटले आहे.

### काजूला हमीभाव मिळण्यासाठी १० मार्च रोजी दोडामार्ग येथे रस्ता रोको

११५ रूपये एवढा अल्प दर दिला जात आहे त्यामुळे शेतकरी मेटाकुटीला आला आहे. वारंवार मागणी करून जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी सरकार लक्ष देत नाही त्यामुळे आंदोलन करण्याचा निर्णय बैठकीत घेण्यात आला. यावेळी विलास सावंत, प्रविण परब, लक्ष्मण नाईक, राकेश धर्णे, चंद्रशेखर देसाई, आकाश नरसुले, संतोष देसाई, राजेंद्र गवस, दत्तात्रय गंवडे, अरविंद गवस, दिपक नाईक, भिमराव देसाई, अरूण देसाई, चेतन देसाई इतर शेतकरी उपस्थित होते.

### चिंदर-तेरई-कालावल मंजूर रस्त्याचे काम अद्याप पर्यंत का सुरू केले नाही?

आलेली नाही. रस्त्याची अवस्था अतिशय दयनीय अशी झालेली आहे. परिणामी सदर रस्त्यावरून ये-जा करताना शाळेतील मुलांना तसेच गावातील रहिवाशांना मानसिक व शारिरीक त्रास सहन करावा लागतो. तरी सदर रस्त्याला निधी उपलब्ध असूनही तसेच जिल्हयाच्या पालकमंत्र्यांच्या हस्ते सदर रस्त्याच्या कामाचे भुमिपूजन झाले असूनही काम का रखडले आहे याचे सविस्तर उत्तर आम्हाला लेखी स्वरूपात देण्यात यावे ही विनंती. अशी मागणी ग्रामस्थानी केली आहे.

### गोठणे गावातील चारवाड्यांचा मुख्यरस्ता गोठणेमाळ ते सडेवाडी आजही पक्की सडक बनण्याची करतोय प्रतीक्षा



ग्राम पंचायत गोठणे यांनी मुख्यमंत्री कार्यालयाशीही या संदर्भात माजी मुख्यमंत्री उध्दव ठाकरे यांनाही पत्र पाठवून रस्याची मागणी केली होती. ग्रामस्थांना त्यांच्या विषयी आशा होती ठाकरे साहेब काहीतरी मार्ग काढतील आणि संबंधीत यंत्रणेला सुचवतील पण तसे काही झाले नाही. पालकमंत्री रविंद्र चव्हाण सिंधुदुर्ग दौऱ्यावर येत आहेत. मागिलवेळी रविंद्र चव्हाण यांनी हा रस्त्याचे काम तातडीने सुरू करतो असे आश्वायन दिले हाते परंतू तसे काही झाले नाही. स्थानिक आमदारांशी पत्रव्यवहार, तसेच भेटून रस्त्यासंदर्भात कल्पना देवूनही विकासासाठी निधी कमी पडू देणार नाही असे आश्वासने देवूनही हातवर केल्याची खंत येथील ग्रामस्थांनी व्याक्त केली आहे.

गावठणवाडी, घाडीवाडी, बांदकीवाडी, आणि सडेवाडी या चारवाड्या मिळून लोकसंख्या जवळपास पाचशेहून अधिक आहे. पण पक्का रस्ता नसल्याने या वाड्यांच्या विकासाला खिळ बसली आहे. याच रस्त्याला लागूनच गावचे ग्रामदेवतेच्या मंदीराला देव दर्शनासाठी मोठ्यासंखेने भाविक येत असतात. पण रस्ता नसल्याने भाविकांना त्रास सहन करावा लागतो आहे. तीच अवस्था येथील ग्रामस्थांची आहे. वाहने रस्त्याअभावी वाडीपर्यंत येत नसल्याने आजारी वृध्दांना, गर्भवती महीलांना पायी अथवा मोठ्या प्रमाणात आर्थीक दंड सोसून उपचारासाठी धक्के सोसत जावे लागते आहे. तसेच पावसाळ्यात रस्ता चिखलमय बनून डबक्यानी पाणी साचत असल्याने मुलेही शाळेत जायला फारशी पाहत नसल्याने त्यांचे शैक्षणिक नुकसान मोठ्या प्रमाणात होत असल्याचे ग्रामस्थांनी म्हंटले आहे.

### देशातील हुकूमशाही विरोधात रत्नगिरीत ११ मार्चला 'निर्भय बनो' सभेचे आयोजन

मूलभूत प्रश्नांकडे जनतेचे लक्ष जाऊ नये म्हणून मंदिर, मस्जिद मुद्दे उपस्थित करून सर्वसामान्य जनतेचे लक्ष वळवले जात आहे. संसदेत मूलभूत प्रश्नांवर आवाज उठवणाऱ्या खासदारांना मोठ्या प्रमाणावर सांविधानिक पद्धतीने निलंबित केले जात आहे. सरकारी उद्योगांचे खासगीकरण, कमी पटसंख्येच्या नावाखाली हजारो शाळा बंद करत बहुजनांच्या मुलांना शिक्षणापासून वंचित केले जात आहे. भांडवलदारांच्या हिताचा विचार करून शेतकरी आणि आदिवासींच्या जमिनी बेकायदेशीर हस्तांतरित केल्या जात आहेत. शेतीचे कंपनीकरण करण्याचे धोरण, कामगारांच्या सुरक्षिततेसाठी बनविलेले कायदे बदलून भांडवलदारांच्या हिताचे करण्याचे काम सुरू आहे.

माध्यमांचे स्वातंत्र्य काढून घेतले जात आहे. सरकारी यंत्रणांचा वापर करून देशातील विरोधी पक्ष संपविण्याची प्रक्रिया बिनदिक्कत सुरू आहे. सरकारच्या जनविरोधी धोरणांविरुद्ध बोलणाऱ्या, लिहिणाऱ्या, प्रश्न विचारणाऱ्या लोकांना देशद्रोहाच्या आरोपाखाली तुरुंगात टाकले जात आहे. अशा परिस्थितीत समाजातील बुद्धिजीवी, विचारवंत, समाजिक जाणीव असणारी व्यक्ती, संस्था, संघटना, पक्षांनी शांत न राहता निर्भय होऊन या व्यवस्थेच्या विरोधात संघटितपणे लढा उभारणे गरजेचे आहे. यादृष्टीने प्रबोधन करण्याच्या उद्देशाने 'निर्भय बनो' हे अभियान महाराष्ट्रभर राबविले जात आहे. या अभियानाचा एक भाग म्हणून 'आम्ही निर्भय रत्नागिरीकर'तर्फे येथे ही सभा आयोजित केली आहे. या सभेला रत्नागिरी शहर-तालुका तसेच संगमेश्वर, लांजा, राजापूर तालुक्यातून जास्तीत जास्त नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन संयोजक अभिजीत हेगशेट्ये, दीपक राऊत, बशीर मुर्तुझा, विलास कोळपे, कुमार शेट्ये यांनी केले आहे.

## थोडक्यात



### चितारआळीतील धोकादायक लोखंडी विद्युतखांब बदला

**सावंतवाडी । प्रतिनिधी**

शहराचे चितारआळीतील परिसरात उभाबाजार कडे जाणाऱ्या रस्त्यावर जिल्हा परिषद शाळेसमोर धोकादायक स्थितीत असलेला लोखंडी विद्युतखांब तात्काळ बदला अशी मागणी माजी नगरसेवक सुरेश भोगटे यांनी वीज वितरणकडे निवेदनद्वारे केली. दरम्यान शहरांमध्ये मोठ्या प्रमाणात जीर्ण झालेले विद्युत खांब धोकादायक स्थितीत आहेत अशा प्रकारे एक खांब उभा बाजार परिसरात जाणाऱ्या रस्त्यावर जिल्हा परिषद शाळा नंबर एकच्या समोर आहे.

### शासकीय कर्मचाऱ्याला धमकी, एकाची निर्दोष मुक्तता

**सावंतवाडी । प्रतिनिधी**

शासकीय कर्मचाऱ्याला शिवीगाळ करुन जीवे मारण्याची धमकी दिल्या प्रकरणी समिर म्हाडेश्वर (रा. ढोलकरवाडी, माणगाव) याची निर्दोष मुक्तता केलेली आहे. या कामी ॲड.अनिल निरवडेकर, गणेश चव्हाण यांनी काम पाहिले.

याबाबत अधिक वृत्त असे की, म्हाडेश्वर याच्या घरा समोरून सागाच्या झाडाची तोड करुन ती कापून घेवून गेल्याचा माग लागल्याने वनरक्षक यांनी संशयिताच्या घरी व आजुबाजूला चौकशी केली, त्या रागातून त्याने फिर्यादी यांना शिवीगाळ करून मारहाण करण्याची धमकी दिली होती.

### सर्वोच्च न्यायालयाचा शिंदे गटाला धक्का!

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

शिवसेना आमदार अपात्रतेप्रकरणी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी दिलेल्या निकालाविरोधात याचिकेवर आज सर्वोच्च न्यायालयात सुनावणी पार पडली. यावेळी न्यायालयाने १ एप्रिलपर्यंत या आदेशाची कागदपत्रे सर्वोच्च न्यायालयात सादर करण्याचा आदेश विधानसभा अध्यक्षांना दिले आहेत. त्यामुळं शिंदे गटासाठी हा धक्का मानला जात आहे.

**ग्रामपंचायत कार्यालय उंडील, तालुका - देवगड, जिल्हा - सिंधुदुर्ग**

जाक. ग्रा.पं.उंडील/ /२०२४ दिनांक : ७/३/२०२४

**टेंडर नोटीस**

ग्रामपंचायत उंडील येथे १५ वा वित्त आयोग ग्रा.पं.स्तर योजने अंतर्गत खालील प्रमाणे जाहीर निविदा सुचना प्रसिद्ध करणेत येत आहे. ग्रा.पं.उंडील कार्यक्षेत्रातील व कार्यक्षेत्रा बाहेरील सर्व शासकीय मक्तेदार यांस कळविणेत येते की, खालील कामांसाठी सिलबंद लखोट्यात निविदा मागविणेत येत आहे. तरी इच्छुक मक्तेदार/ठेकेदार यांनी सुट्टीचे दिवस वगळून कार्यालयीन वेळेत प्रसिद्ध दिनांकापासून सात (७) दिवसांत ग्रा.पं.कार्यालयामधे आणून दयाव्यात.

| अ.क्रं. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | लेखाशिर्ष |
|---|---|---|---|
| १. | उंडील ब्रम्हादेव मंदीर येथे गणपती विसर्जन कट्टा बांधणे ता.देवगड | ६४,५३५/- | १५ वा वित्त आयोग सन २०२३/२४ |

**अटी व शर्ती -**

सदर कामाबाबत अटी व शर्ती ग्रा.पं.कार्यालयात पहाणेस उपलब्ध आहेत. तसेच शासकीय नियमानुसार जी.एस.टी, ग्रा.पं. कमीशन व इतर कपात यांची रक्कम देयकातून परस्पर कपात करून घेण्यात येईल.

सही/- सरपंच
ग्रामपंचायत उंडील,
ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग

सही/- ग्रामसेवक
ग्रामपंचायत उंडील,
ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग

**ग्रामपंचायत कार्यालय, बोर्डवे तालुका-कणकवली, जिल्हा - सिंधुदुर्ग**

जा.नं./ग्रा.पं.बो./४९२/२०२४ दिनांक : ०७/०३/२०२४

**जाहिर निविदा**

ग्रामपंचायत बोर्डवे कडून खालिल विकास कामांची याव्दारे जाहीर निविदा प्रसिध्द करून त्यासाठी नोंदणीकृत मक्तेदारांकडून सिलबंद निविदा खालिल अटी व शर्तीसह मागविण्यात येत आहेत.

| अ.क्रं. | कामाचे नाव | निधीचे नाव | मंजूर निधी | अंदा.रक्कम |
|---|---|---|---|---|
| १. | ग्राम पंचायत बोर्डवे कार्यालय विस्तारीकरण करणे व अनुषंगिक कामे करणे. | १५ वा वित्त आयोग सन २०२४-२५ | रु.९७५००/- | रु.९७५००/- |

**अटी व शर्ती-**

१. सर्व निविदा ग्रा.पं.बोर्डवे कार्यालयात (सुट्टीचे दिवस वगळून) दि. ०८/०३/२०२४ ते दि.१४/०३/२०२४ पर्यंत द्याव्यात.
२. वरील नमूद योजना अंतर्गत उपलब्ध निधी नुसार कामाचे देयक अदा केले जाईल. याबाबत मागाहून कोणत्याही तकारिचा विचार केला जाणार नाही.
३. निविदेसोबत मक्तेदारांनी आवश्यक ते कागदपत्रे जोडावित.
४. मंजूर निविदा दि. १५/०३/२०२४ रोजी उघडली जाईल. मंजूर निविदा धारकांनी रु.६००/- बॉडपेपर वर करारनामा करावा. व १% सुरक्षा अनामत रक्कम बिलातून वजावट करण्यात येईल.
५. कामाच्या बिलातून सर्व शासकिय वजावट केली जाईल.
६. कोणतेही कारण न देता प्राप्त निविदांपैकी कोणतीही किंवा सर्व निविदा फेटाळण्याचा अधिकार ग्रामपंचायत राखून ठेवीत आहे.

सही /- ग्रामसेवक
ग्रामपंचायत बोर्डवे
ता.कणकवली, जि.सिंधुदुर्ग

सही /- सरपंच
ग्रामपंचायत बोर्डवे
ता.कणकवली, जि.सिंधुदुर्ग

# महाशिवरात्र आणि अमावस्या स्नानाच्या पर्वणीमुळे यात्रा गर्दीचे उच्चांक मोडणार !





**देवगड । पांडूशेठ साटम**

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील प्रसिद्ध देवस्थान आणि कोकणची दक्षिण काशी अशी ओळख असणाऱ्या देवगड तालुक्यातील श्री क्षेत्र कुणकेश्वरची महाशिवरात्रीनिमित्त होणारी कुणकेश्वर यात्रा ही आठ ते दहा मार्च कालावधीत संपन्न होणार आहे. दरम्यान १० मार्च रोजी तीर्थस्थानाचा योग असल्याने मोठ्या प्रमाणात भाविक भक्तांची मोठ्या प्रमाणात गर्दी होण्याची शक्यता मंदिर प्रशासनाने व्यक्त केली आहे. यात्रा नियोजनाच्या दृष्टीने कुणकेश्वर देवस्थान ट्रस्टने युद्धपातळीवर कामं करण्यास सुरुवात केली आहेत. कोकणची काशी म्हणून प्रसिद्ध असलेल्या श्री क्षेत्र कुणकेश्वरची महाशिवरात्री यात्रा शुक्रवार दि.८ मार्च २०२४ रोजी संपन्न होत असून रविवार दि. १० मार्च २०२४ रोजी देवस्वाऱ्यांच्या पवित्र तीर्थस्थानाने यात्रोत्सवाची सांगता होणार आहे. यावेळी यात्रोत्सव सोहळा तीन दिवसांचा असणार आहे.

श्री क्षेत्र कुणकेश्वर यात्रेसाठी मागील काही वर्षात भाविकांच्या गर्दीच्या प्रमाणात लक्षणीय वाढ होत आहे. दरम्यान यावर्षी अमावास्या १० मार्च रोजी असल्याने तीर्थस्नानास आणि देवभेटीकरता येणाऱ्या देवस्वाऱ्यांना संपूर्ण दिवस लाभ घेता येणार आहे. जिल्ह्यातील आंगणेवाडी यात्रेपाठोपाठ कुणकेश्वर यात्राही जिल्ह्यासोबत राज्य आणि परराज्यातील भाविकासोबत मुंबईकर चाकरमान्यासाठीही फार मोठी पर्वणी मानली जाते. यावर्षी ६ गावचे देव श्री देव कुणकेश्वरच्या भेटीला येत आहेत. यामध्ये मुणगे गावची ग्रामदेवता श्री देवी भगवती ७ वर्षांनी श्री देव बोंबडेश्वर-पावणाई मठबुद्रुक, मालवण २३ वर्षांनी श्री देव भैरवनाथ वरवडे, कणकवली ४० वर्षांनी श्री देव माधवगिरी माईन कणकवली. श्री. देव गांगेश्वर नारिंग्रे देवगड १५ वर्षांनी श्री देव बानकिलिंग पावणादेवी हुबंरठ कणकवली ५ वर्षांनी श्री देव कुणकेश्वराची भेट घेणार आहेत. दि. १० मार्च रोजी येथील समुद्र तीर्थावर तीर्थस्नान केल्यावर सर्व देवता आपल्या परतीच्या प्रवासाला निघणार आहेत. दरम्यान यात्रोत्सवाची तयारी अंतिम टप्प्यात आली असून भाविकांना कोणत्याही प्रकारे त्रास न होता सुलभ दर्शन व्हावे यासाठी श्री देव कुणकेश्वर मंदिर देवस्थान ट्रस्टच्या वतीने सर्वतोपरी प्रयत्न केले जात आहेत.

दक्षिण कोकणची काशी म्हणून प्रसिद्ध असलेल्या श्रीक्षेत्र कुणकेश्वर यात्रा उत्सव दिनांक ८ मार्च १० मार्च कालावधीत संपन्न होत आहे. श्री देव कुणकेश्वर देवस्थान ट्रस्ट,ग्रामपंचायत कुणकेश्वर,त्याचप्रमाणे पोलीस प्रशासन यंत्रणा, महसूल यंत्रणा, जिल्हा परिषद,पंचायत समिती, सार्वजनिक बांधकाम,महसूलविभाग,राज्य विज वितरण कंपनी, यांनी आपल्या पद्धतीने भाविक भक्तांना आणि त्याचप्रमाणे व्यापारी बंधूंना आवश्यक त्या सोयी सुविधा देण्याकरिता कार्यवाही पूर्ण केली आहे.दिनांक ८ मार्च रोजी रात्री ३ वाजल्यापासून श्री देव कुणकेश्वर दर्शनाकरिता भाविकांना खुले करण्यात येणार आहे.तत्पूर्वी यामध्ये या मंदिराचे पुजारी मानकरी आणि त्याच प्रमाणे जे प्रमुख मान्यवर असतील त्यांच्या हस्ते पूजा झाल्यानंतर मंदिर भाविकांसाठी खुले करण्यात येणार आहे.आणि या अनुषंगाने श्री देव कुणकेश्वर देवस्थान ट्रस्टच्या वतीने कुणकेश्वर मंदिर परिसर आकर्षक विद्युत रोषणाई त्याचबरोबर फुलांच्या आरसा करून साजवीन्यात आले आहे.

आणि विशेषता भावीक भक्तांना आवश्यक असणाऱ्या सर्व दर्शनरांगा पूर्णपणे सज्ज करण्यात आले आहेत. व्हीआयपी साठी देखील यावर्षीपासून विशेष व्यवस्था करण्यात आली आहे. या ठिकाणी आवश्यक असणाऱ्या ज्या सोयी सुविधा पूर्ण करण्यात आल्या आहेत. त्याचप्रमाणे ठीक ठिकाणी स्वयंसेवक तैनात करण्यात आले आहेत.कुणकेश्वर मंदिराचा संपूर्ण परिसर या ठिकाणी प्रत्येक विविध प्रकारच्या दुकानांची सजावट आणि दुकानांच्या आगमन झाले असून ही संपूर्ण पणे दुकाने या ठिकाणी ८ मार्च १० मार्च या कालावधीत अहो रात्र सुरू ठेवण्यात येणार आहेत. येणारे भाविक भक्त आणि व्यापारी बंधू आणि येणाऱ्या देवस्वाऱ्या यांना आवश्यक असणारे सोयी सुविधा पुरविणे या साठी श्री देव कुणकेश्वर देवस्थान ट्रस्ट ग्रामपंचायत सज्ज झाली आहे.तसेच या ठिकाणी येणाऱ्या भाविकांना सूसज्ज राज्य परिवहन महामंडळाच्या देवगड, विजयदुर्ग, कणकवली ,मालवण, व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील अन्य आगारातून खास एसटीच्या जादा फेऱ्यांची व्यवस्था करण्यात आलेली आहे, त्याचबरोबर या भागात येणारे जे भाविक भक्तगण एसटीचे प्रवासी असतील त्यांच्या आवश्यकतेनुसार पार्किंगची विशेष व्यवस्था करण्यात आली आहे.एक पार्किंग व्यवस्था ही कणकवली-मालवण वरून येणारी कुणकेश्वर सुकेतळे सडा या ठिकाणी देवगड-विजयदुर्ग भागातून व्यवस्था ही देवगड तारामुंबरी हॉटेल अस्मि या ठिकाणी करण्यात आली आहे. आणि त्याचप्रमाणे मीठबाव मालवन वरून येणाऱ्या भाविकांसाठी पार्किंगची व्यवस्था कुणकेश्वरच्या ठिकाणी करण्यात आली आहे.

## थोडक्यात



### मंत्री छगन भुजबळ यांचे राष्ट्रवादीकडून जल्लोषी स्वागत

**बांदा । वार्ताहर**

सिंधुदुर्ग दौऱ्यावर असलेल्या अन्न आणि नागरी पुरवठा मंत्री तसेच ग्राहक संरक्षण कॅबिनेट मंत्री छगन भुजबळ यांचे बांदा येथे जंगी स्वागत करण्यात आले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अबीद नाईक, कार्याध्यक्ष काका कुडाळकर, प्रदेश चटणीस सुरेश गवस, सावंतवाडी तालुकाध्यक्ष उदय भोसले, महिला जिल्हाध्यक्ष प्रज्ञा परब, सावंतवाडी महिला तालुकाध्यक्षा रिद्धी परब, कुडाळ महिला तालुकाध्यक्षा पूजा पेडणेकर, जहिरा शेख, महिला शहाराध्यक्षा रंजना निर्मळ, व्ही.जे.एन.टी सेल जिल्हाध्यक्ष अशोक पवार, अल्पसंख्याक जिल्हाध्यक्ष असलम खतीब, सामाजिक न्याय विभागाचे जिल्हाध्यक्ष विजय कदम, जिल्हा सचिव गुरुदत्त कामत, दोडामार्ग तालुकाध्यक्ष सत्यवान गवस, आदी पदाधिकारी उपस्थित होते.



### खोदकाम सुरू असताना पडेलमध्ये सापडली मूर्ती

**देवगड । वार्ताहर**

तालुक्यातील पडेल येथे नळयोजना कामासाठीचे खोदकाम सुरू असताना एक मूर्ती सापडली. मूर्ती सापडल्याचे कळताच स्थानिकांनी धाव घेतली. ती विष्णूची मूर्ती असावी, असा इतिहास अभ्यासकांचा प्राथमिक अंदाज आहे. पडेल गावात नळयोजना पाईप लाईन टाकण्यासाठी खोदाईचे काम सुरू आहे. काम सुरू असतानाच तेथील एका मंदिरालगत एक मूर्ती आढळली. मूर्ती मातीबाहेर काढण्यात आली. मूर्ती सापडल्याचे कळताच ग्रामस्थांनी तिकडे धाव घेतली. अनेकांनी मोबाईलमध्ये मूर्ती टिपण्यासाठी धडपड केली.

### परूळेत पूर्ववैमनस्यातून तरूणावर कोयतीने वार

**राजापूर । वार्ताहर**

तालुक्यातील परूळे पाटीलवाडी येथे पूर्ववैमनस्यातून तरूणावर कोयतीने वार केले. या प्रकरणी निशांत विश्राम सावंत (रा. परुळे, राजापूर) याच्याविरोधात राजापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना रविवार ३ मार्च रोजी दुपारी ३ च्या सुमारास घडली. या प्रकरणी राजापूर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार विद्या मुकुंद माने यांचा चुलत पुतण्या निशांत सावंत एकमेकांच्या शेजारी- शेजारीच रहात असून गेल्या १० वर्षांपासून त्यांच्यात शौचालयाच्या टाकी बांधण्याच्या कामावरुन वादविवाद सुरु आहेत. दरम्यान, रविवारी दुपारी तक्रारदार यांचा मुलगा घराबाहेर उभा असताना संशयित निशांत सावंतने त्याला शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. त्यानंतर हातातील कोयत्याने त्याच्या डाव्या हाताच्या मनगटावर मारुन दुखापत केली. या दोघांचे भांडण सोडवण्यासाठी फिर्यादी विद्या माने मध्ये पडल्या असता निशांतने त्यांनाही ढकलून दिले. संशयिताविरोधात भादंवि कायदा कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### रत्नागिरीत १५ मार्च रोजी डाक अदालत

**रत्नागिरी । प्रतिनिधी**

अधीक्षक डाकघर, विभागीय कार्यालयाद्वारा १५ मार्च रोजी अधीक्षक डाकघर, विभागीय कार्यालय, गोगटे जोगळेकर कॉलेज शेजारी येथे दुपारी ३ वाजता डाक अदालत होणार आहे. पोस्टाच्या कामासंबंधीच्या ज्या तक्रारींचे निराकरण झाले नसेल व समाधानकारक उत्तर मिळाले नसेल अशा तक्रारींची डाक अदालतीत दखल घेतली जाईल.

## ज्येष्ठ समाजसेवक कृष्णाजी साळेकर यांचा वाढदिवस साजरा !




**ठाणे । प्रतिनिधी**

पूर्व येथील जेष्ठ समाजसेवक, अनेक सामाजिक संस्थांचे आधारस्तंभ कृष्णाजी साळेकर यांनी ऐंशी वर्षात पदार्पण केल्या बद्दल ज्येष्ठ पत्रकार विश्वनाथ पंडित यांच्या हस्ते ठाणे पूर्व येथील स्वराज सामाजिक सेवा संस्थेच्या वतीने थाटात वाढदिवस साजरा करण्यात आला. यावेळी संस्थेचे सदस्य व नागरिक यांची उपस्थिती लक्षणीय होती.

## आंबोलीत प्रशासनाच्या दणक्याने अनधिकृत १४ बंगले, ४ चौथरे व १ विहीर जमीनदोस्त



**आंबोली । वार्ताहर**

येथील हिरण्यकेशी वनपरिक्षेत्रातील वन सर्वे क्रं २३ या वनविभागाच्या ताब्यात असलेल्या शासकीय वनजमिनीवर अनधिकृतपणे अतिक्रमण करून सदर क्षेत्रात १४ बंगले,४ चौथरे व १ विहीर (सर्व चिरेबंदी बांधकाम) करण्यात आले होते. सदर प्रकरणी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ कलम ५३,५४ व ५४(अ) नुसार योग्य तो तपास पूर्ण करून आज मंगळवार दि ५ मार्च रोजी महसूल विभागाच्या व वनविभागाच्या संयुक्त कारवाईने आंबोली हिरण्यकेशी येथील वन सर्वे क्रं २३ मधील क्षेत्रात अतिक्रमण करून बांधकाम केलेले १४ बंगले,४ चौथरे व १ विहीर तसेच सदर क्षेत्रातील इतर साहित्य जेसीबीने जमीनदोस्त करण्यात आले आहे.अतिक्रमण निष्कासन कामी झालेला खर्च संबंधित अतिक्रमण करणाऱ्यांच्या नावावर महसुली अभिलेखी बोजा चढविण्यात येणार असल्याचे संबंधित विभागाने सांगितले आहे.अतिक्रमण हटाव प्रकरणी सावंतवाडी पोलीस ठाण्याचे मोठे सहकार्य लाभले. दरम्यान या कारवाई बाबत प्रशासनाकडून कमालीची गुप्तता पाळण्यात आली होती.

## ग्रामीण तीर्थक्षेत्र विकास योजनेंतर्गत कोकणातील दोन तीर्थक्षेत्रांना पाच कोटी रुपयांचा निधी मंजूर

**रत्नागिरी । प्रतिनिधी**

कोकणातील 'ब' वर्गातील तीर्थक्षेत्रांचा पायाभूत विकासाकरीता शाश्वत वाढीव निधी उपलब्ध होण्यासाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर ग्रामीण तीर्थक्षेत्र विकास योजनेंतर्गत तीर्थक्षेत्रांना सुमारे पाच कोटी रुपयांचा अतिरिक्त निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. त्यामध्ये रत्नागिरी जिल्ह्यातील गणपतीपुळे आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कुणकेश्वर या प्रमुख तीर्थस्थळांचा समावेश आहे. अयोध्यास्थित प्रभू श्रीराम जन्मभूमी मंदिर विकास या संकल्पनेच्या धर्तीवर महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील महत्वपूर्ण अशा 'ब' वर्गातील तीर्थक्षेत्रांचा विकास करण्यासाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर ग्रामीण तीर्थक्षेत्र विकास योजनेस मंजुरी देण्यात आली. या योजनेतंर्गत कोकणातील 'ब' वर्गातील तीर्थक्षेत्रांना दोन कोटीऐवजी पाच कोटींचा विकासनिधी उपलब्ध करण्यात येणार आहे. ग्रामीण भागातील तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी भाविक आणि यात्रेकरूंना विविध सोयीसुविधा पुरवणे आवश्यक आहे; मात्र स्थानिक स्वराज्य संस्थांना त्यांच्या तुटपुंजा उत्पन्नामुळे या सोयीसुविधा पुरवणे शक्य होत नाही म्हणून शासनाने ग्रामीण भागातील तीर्थक्षेत्रांचा विकास करण्यासाठी पाच कोटींचा निधी उपलब्ध करून दिला आहे. तीर्थक्षेत्रांना नवीन प्रस्तावित निकषाप्रमाणे ३ कोटी इतका निधी मंजूर करण्यात येणार आहे. प्रादेशिक योजनेत आणखी दोन कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत. या निधीमधून विविध सुविधा निर्माण करण्यास मदत होणार आहे. त्यामध्ये तीर्थक्षेत्राकडे जाणारे रस्ते, पथदीप, मंदिर परिसर, संरक्षक भिंत, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, स्वच्छतागृहे, स्नानगृह, भाविकांसाठी भक्तनिवास, परिसर सुशोभीकरण, वृक्षारोपण, वाहनतळ यासंह पर्यटकांची सुरक्षितता, अशा विविध सुविधा या ठिकाणी करता येणार आहेत.

## कोकणात भाजप व शिंदे गटाच्या शिवसेनेत सुरु झाला शिमगा!

**रत्नागिरी । प्रतिनिधी**

भाजप चे मंत्री रवींद्र चव्हाण राष्ट्रवादी बरोबर बजेटच्या कामाची भूमिपूजने करत असल्याचा आरोप रामदास कदम यांनी केला आहे. महायुतीतल्या तिन्ही पक्षांमध्ये सध्या जागावाटपावरून रस्सीखेच चालू आहे. जागावाटपाबाबत ज्या बातम्या आणि आकडेवारी समोर येत आहेत त्यावरून शिवसनेच्या गोटात संतापाचं वातावरण असल्याचं दिसत आहे. शिवसेनेच्या शिंदे गटातील नेते रामदास कदम यांनी देखील भाजपावरील त्यांचा संताप व्यक्त केला आहे. अशातच, सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाणांकडून माझ्या मुलाला हेतूपुरस्सर त्रास दिला जातोय, असा आरोप शिंदे गटातील नेते रामदास कदम यांनी केला आहे. रामदास कदम म्हणाले, महाराष्ट्र भाजपा जे काही करत आहे ते अतिशय घृणास्पद आहे. त्यामुळे माझी प्रामाणिक इच्छा आहे की, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी महाराष्ट्रातल्या काही नेत्यांचे कान उपटले पाहिजेत, त्यांचे कान पकडले पाहिजेत. प्रत्येकाला आपला पक्ष वाढवायचा आहे. परंतु, जे लोक तुमच्यावर विश्वास ठेवून आले आहेत त्यांचा केसाने गळा कापू नका. असं केल्यास भाजपाकडून लोकांमध्ये एक वेगळा संदेश जाईल, याचं भान त्यांनी ठेवायला हवं.

### डिजिटल पेमेंट माध्यमांबाबत जागृकता प्रशिक्षण वर्ग

**ओरोस । प्रतिनिधी**

भारतीय रिजर्व बँक ऑफ इंडीयाच्या भूगतान और निपटान प्रणाली विभाग मुंबई क्षेत्रीय कार्यालयाच्या वतीने व सिंधुदुर्ग जिल्हा मध्यवर्ती सह. बँक लि., सिंधुदुर्ग यांच्या सहकार्याने ७ मार्च रोजी डिजीटल पेमेंटबाबत जागृकता सप्ताहाच्या निमित्ताने विविध डिजिटल पेमेंट माध्यमांबाबत जागृकता प्रशिक्षण वर्गाचे आयोजन सावंतवाडी येथील हॉटेल मँगो येथे करण्यात आले. या प्रशिक्षण वर्गाला सावंतवाडी व आसपासच्या भागातील बचत गटातील महिलांचा उत्स्फुर्त प्रतिसाद लाभला.







**ग्रामपंचायत कार्यालय मोर्ले, तालुका - दोडामार्ग, जिल्हा - सिंधुदुर्ग**

दिनांक : ०५.०३.२०२४

**निविदा**

ग्रामपंचायत मोर्ले ता. दोडामार्ग यांजकडून खालील नमुद केलेल्या कामांकरीत ठेकेदारांकडुन निविदा मागविणेत येत आहेत. सदरची दरपत्रके दि. ११.०३.२०२४ रोजी दुपारी १०.०० वाजेपर्यत स्वीकारली जातील. शक्य झाल्यास त्याच दिवशी दुपारी १०.३० वाजता हजर असणाऱ्या ठेकेदारांसमोर उघडणेत येतील.

| अ.क्रं. | कामाचे नाव | योजनेचे नाव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|---|
| १. | मोर्ले चव्हाटा मंदिर ते सातेरी मंदिर रस्ता खडीकरण डांबरीकरण करणे. | जनसुविधा विशेष योजना | ४९९६१४/- |

**अटी व शर्ती**

१. सर्व अटी व शर्ती ग्रामपंचायत नोटीस बोर्ड वर पहावयास मिळतील.
२. कोणतीही एक अगर सर्व निविदा नाकारणेचा अधिकार खाली सही करणार यांनी राखून ठेवला आहे. कोणत्याही प्रकारचा लेखी पत्र व्यवहार केला जाणार नाही.
३. मक्ता मंजुर केल्याचे कळविल्यावर आदेशात नमुद केलेल्या मुदतीत व कामाच्या ठिकाणी उपअभियंता बांधकाम उपविभाग दोडामार्ग यांच्या व उपअभियंता ग्रा.पा.पु.उपविभाग दोडामार्ग यांच्या तांत्रिक सुचनेप्रमाणे काम पूर्ण करणेचे आहे.
३. कामापोटी शासननिर्णयानुसार जीएसटी व ग्रामपंचायत कामिशन १% कपात करण्यात येईल.
४. कामाचे बाबत ग्रामपंचायतीच्या सुचना अंमलात आणणेच्या आहेत. अन्यथा बिल देणेस कार्यालय जवाबदार असणार नाही.

सही /- सरपंच
ग्रामपंचायत मोर्ले
ता.दोडामार्ग, जि.सिंधुदुर्ग

**ग्रामपंचायत कार्यालय घोटगेवाडी, तालुका - दोडामार्ग, जिल्हा - सिंधुदुर्ग**

दिनांक : ०५.०३.२०२४

**निविदा**

ग्रामपंचायत घोटगेवाडी ता. दोडामार्ग यांजकडून खालील नमूद केलेल्या कामांकरीता ठेकेदारांकडून निविदा मागविणेत येत आहेत. सदरची दरपत्रके दि. ११/०३/२०२४ रोजी दुपारी १०.०० वाजेपर्यत स्वीकारली जातील. शक्य झाल्यास त्याच दिवशी दुपारी १०.३० वाजता हजर असणाऱ्या ठेकेदारांसमोर उघडणेत येतील.

| अ.क्रं. | कामाचे नाव | योजनेचे नाव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|---|
| १. | घोटगेवाडी घाटीवरून बाजारवाडी या ठिकाणी रस्ता पायऱ्या बांधकाम करणे. | १५ वा वित्त आयोग (प.स.स्तर) | ११४९८२/- |
| २. | घोटगेवाडी येथे रस्ता क्रॉसिंग पाईप बसविणे. | १५ वा वित्त आयोग (प.स.स्तर) | २४८४६/- |
| ३. | घोटगेवाडी येथे गटार बांधकाम करणे. | १५ वा वित्त आयोग (प.स.स्तर) | ८२४०६/- |
| ४. | घोटगेवाडी झेंडा चौक ते मणेरीकर घरापर्यंत गटार बांधकाम करणे. | १५ वा वित्त आयोग (प.स.स्तर) | १३००००/- |

**अटी व शर्ती**

१) सर्व अटी व शर्ती ग्रामपंचायत नोटीस बोर्ड वर पहावयास मिळतील.

सही /- सरपंच
ग्रामपंचायत घोटगेवाडी
ता.दोडामार्ग, जि.सिंधुदुर्ग